नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक ४८ * | * अकोला * | मंगळवार, दिनांक १९ ऑगस्ट २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## दिल्लीतील शाळांना बॉम्बच्या धमक्या

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :**
सोमवारी दिल्लीतील तीन शाळांना बॉम्बने उडवण्याच्या धमक्या मिळाल्या. यानंतर, खबरदारीचा उपाय म्हणून शाळा रिकाम्या करण्यात आल्या आहेत. या शाळांमध्ये दिल्ली पब्लिक स्कूल, मॉडर्न कॉन्व्हेंट आणि श्रीराम स्कूलचा समावेश आहे.

दिल्ली अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, त्यांना सकाळी ७ वाजता शाळेत स्फोटक यंत्र असल्याची माहिती मिळाली. दिल्ली पोलिस, बॉम्ब पथक आणि श्वान पथकाची अनेक पथके घटनास्थळी पोहोचली आहेत. शोध मोहीम सुरू आहे. जुलै महिन्यात दिल्ली, मुंबई आणि बंगळुरूमधील शाळांनाही धमकीचे ईमेल आले होते .

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## पावसाचा कहर

उत्तराखंड पासून महाराष्ट्र पर्यंत यत्र, तत्र आणि सर्वत्र पावसाने थैमान मांडलेले आहे. आपल्या पर्यावरणाशी आपणच मोठा खेळ खेळल्यामुळे आता आपल्याच पर्यावरणाने आपला घात करण्याचे ठरवलेले दिसत आहे. कारण सध्या हवा तेव्हा पाऊस येत नाही नको तेव्हा पाऊस येतो त्या पावसाचे प्रमाण आटोक्या बाहेरचे असते. तो पाऊस प्रचंड प्रमाणात ढासळतो. आपल्या महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमधील अनेक नद्यांना महापूर आलेला आहे गावागावात अनेक ठिकाणी सर्व नदी, नाले आणि या प्रलयामुळेही अनेक गावेच्या गावे तुडुंब भरलेली आहेत. कोकणात पावसाने आपला महाप्रताप दाखवला आहे. मुखेड मध्ये तर अक्षरशः कहर झाला आहे. मुंबईसारख्या शहरात सर्व व्यवहार अत्यंत उशिराने होत आहेत, मुंबई सह पालघर ठाण्यामध्ये शाळा महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आलेली आहे. सगळे जनजीवन अस्ताव्यस्त झालेले आहे तरीही असाच पाऊस सुरू राहिला तर शेतीचे फार मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या जीवावर नेहमीच गंभीर संकट असते दररोज शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बातम्या येतात आता आपले मन इतके बथ्थड झालेले आहे की शेतकऱ्यांच्या आत्महत्येला वृत्तपत्रांमध्येही लहानशा बातमी इतकी म्हणजेच सिंगल कॉलम इतकीच जागा मिळते. मग आपल्या देशात कोण्या एकेकाळी मोठ्या प्रमाणात वने होती. आपल्या प्रचंड मोठ्या प्रमाणात असलेल्या या विकासवादी दृष्टिकोनामुळे आणि आघोरीपणामुळे हीच घनदाट वने विरळ झालेली आहेत. अनेक ठिकाणी वने शिल्लकच उरलेली नाहीत. विकासाच्या नावावर गडचिरोली सारख्या घनदाट वनांचा जिल्हा आता नक्षलवाद विरहित होणार आहे आणि त्यासोबतच तो वनविरहित होतो की काय अशीही शंका आहे. मोठमोठ्या महामार्गाच्या स्थापनेसाठी मोठमोठी झाडे आणि गरीब शेतकऱ्यांची शेती ज्याच्यामध्ये काहीही पिकू शकते अशी शेती आणि वनाची झाडे एखाद्या सलूनमध्ये एखादा न्हावी जसे केस भराभर कापतो त्याप्रमाणे सपासप कापली जात आहेत. मुंबईसारख्या महानगरालगत वृक्षांचा वेढा होता. आरे मधील वनांमुळे मुंबईत ऑक्सिजन मिळत होता अशा या आरे कॉलनी मधील वनांवर निष्ठुरपणे आरी चालवून केलेले घनघोर हल्ले आजही ताजे आहेत. शेतकऱ्यांपासून सामान्य नागरिकांपर्यंत निसर्गाची विनाशलीला सर्वजण बघत आहेत आणि या गोष्टी सर्वांनाच बाधत आहेत. या सर्व वातावरणीय बदलांचा परिणाम भविष्यकाळात किती भयानक होऊ शकतो हे फक्त ऐकूनच डोके अक्षरशा चक्राहून जाऊन वेड लागण्याची पाळी आलेली आहे. हिमालयातील ग्लेशीयर्स म्हणजेच हिमनग दिवसेंदिवस आकुंचन पावत आहेत. आपल्या जवळजवळ सर्व नद्या म्हणजेच बऱ्याचश्या नद्या ६० ते ७० टक्के वर्षांपूर्वी बारमाही होत्या. आत्ताच्या परिस्थितीमध्ये त्या फक्त पावसाळी झालेल्या आहेत. मुंबईमध्येही चार-पाच नद्या होत्या. त्या आता सांडपाणी वाहून नेत आहेत. पुण्याच्या मुळा-मुठा कितीतरी आघात सोसत आहेत. सध्या येण केण प्रकारेण मनपा ते ग्रामपंचायती शुद्ध आणि चांगल्या पाण्याचा पुरवठा करीत असतात. उद्या या पाण्याची शाश्वती नाही कदाचित मुंबईकरांना समुद्राचे पाणी गोड करून प्यावे लागेल अशी परिस्थिती आहे. प्रत्येक बाबतीत काही राजकारण्यांना कारणाशिवाय सदैव लढाईच करायची असते जनजीवन सुखकर व्हावे आरोग्यदायी व्हावे अल्हाददायी व्हावे याची कुणालाही पर्वा नाही. त्यांचे पायाला मिठी मारणारे भक्तही तेच करतात. पावसाच्या कहराची अशी बरीचशी वेगवेगळी कारणे आहेत. त्याचा सगळ्यांनी विचार करायला पाहिजे. सध्या राजकारणात बुडालेल्या कोणाजवळ वेळ आहे?

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# राज्यात सर्वदूर मुसळधार!

## मुंबईची तुंबई

### मुंबई, ठाण्याला ४८ तासांचा रेड अलर्ट

### मराठवाड्यात अतिवृष्टी

### विदर्भातील जिल्ह्यांना येलो अलर्ट





■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई / नागपूर दि. १८ :**
मागील काही दिवसांपासून दडी धरून बसलेला पाऊस अखेर आत्ता महाराष्ट्रात परतला आहे. आज सोमवारी पहाटेपासूनच मुंबईसह सर्वदूर महाराष्ट्रात पावसाच्या जोरधारा कोसळत आहेत. परिणामी, राज्याच्या आर्थिक राजधानीतील सखल भागांत पाणी साचल्यामुळे नागरिकांची त्रेधातिरपीट उडाली आहे.

मराठवाडा, विदर्भ, खानदेशासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे गरज असेल तरच घराबाहेर पडण्याचे आवाहन प्रशासनातर्फे केले जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईसह महाराष्ट्रातील पर्जन्यमानाचा आढावा घेतला. ते म्हणाले, समुद्रात किमान तीन मीटरच्या लाटा उसळतील. उद्या ४ मीटरपर्यंत लाटा उसळण्याची शक्यता आहे. लोकांनी काळजी घ्यावी. लाटा पाहण्याच्या मोहापाई लोक अडचणीत येतात, असे म्हणत त्यांनी समुद्रापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

**रस्त्यांवर वाहनांच्या रांगा**

मुंबईतील पावसाचा रस्ते वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. पश्चिम द्रुतगती महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे. एखाद्या कार पार्किंगमध्ये ज्या पद्धतीने गाड्या उभ्या असतात, तशा गाड्या या महामार्गावर उभ्या टाकल्या आहेत.

मुसळधार पावसामुळे अंधेरी सबवेमध्ये पाणी भरण्यास सुरुवात झाली आहे. तर दादर, माटूंगा, चेंबूर, वडाळा परिसरातील रस्ते देखील पाण्याखाली गेल्याने वाहने अडकून पडली आहेत.

हवामान खात्याने मुंबई, रायगड जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला असून पुढील ४८ तासांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. नागरिकांनी अत्यावश्यक गरज असेल तरच घराबाहेर पडावं, असं आवाहन करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची सुरक्षितता, बचाव व मदतकार्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावं. त्यासाठीच्या उपाययोजना तत्काळ राबवाव्यात, असे निर्देश सरकारच्यावतिने देण्यात आले आहेत.

### मुख्यमंत्री फडणवीसांकडून आढावा



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कंट्रोलमधून राज्यातील पावसाच्या परिस्थितीचा आढावा घेतला. राज्यभरातील जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. संपूर्ण महाराष्ट्रात ४ लाख हेक्टर पिके पावसामुळे बाधित झालेली आहेत. यवतमाळ, नांदेड, वर्धा, बीड, वाशीम या परिसरात जास्त नुकसान झालेले आहे. नुकसानग्रस्त भागातील उपाययोजनांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आलेले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. १८ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट दरम्यान विविध भागांत पुन्हा अतिवृष्टी होण्याचा अंदाज आहे. कोकण विभागात जास्तीत जास्त रेड अलर्ट आहे. नाशिक विभागात जळगावला सर्वाधिक तडाखा बसला असून, मराठवाड्यात बीड, लातूर आणि नांदेड या परिसरात मोठ्या प्रमाणात पूरस्थिती आहे. नांदेड जिल्ह्यात मुखेडमधील पाच लोक बेपत्ता झाले. दीडशे पेक्षा जास्त जनावरे वाहून गेल्याची किंवा मृत्यू झाल्याची संभावना आहे. या तीन जिल्ह्यांतील ८०० गावे पावसामुळे बाधित झालेली आहेत. १ लाख हेक्टर शेतीचे नुकसान झालेले आहे. नागपूर विभागात चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये पुढील दोन तीन दिवसांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## सीपी राधाकृष्णन एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १८ :**
जयदीप धनखड यांच्या राजीनाम्यानंतर उपराष्ट्रपतीपद रिकामे झाले आहे. यासाठी लवकरच निवडणूक होणार असून, एनडीएकडून सीपी राधाकृष्णन यांच्या नावाची उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून घोषणा झाली आहे.

आज झालेल्या एनडीएच्या बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीही या बैठकीला हजर होते. बैठकीनंतर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी याबाबत घोषणा केली.



महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना एनडीएने उपराष्ट्रपतीपदाचा उमेदवार म्हणून घोषित केले आहे. ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे, राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे राज्यपाल असून, ते मुंबईतील मतदार देखील आहेत, महाराष्ट्रातील सर्व खासदारांनी राधाकृष्णन यांच्या बाजूने मतदान करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

सीपी राधाकृष्णन हे तामिळनाडूतील भाजपचे माजी अध्यक्ष आहेत. त्यांचे पूर्ण नाव चंद्रपुरम पोनुस्वामी राधाकृष्णन आहे. त्यांनी कोइम्बतूर येथील चिदंबरम कॉलेजमधून बीबीए केले आहे. प्रारंभीपासून ते संघाचे कार्यकर्ते होते. सध्या महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत.

सीपी राधाकृष्णन हे दक्षिण भारतातील भाजपच्या महत्वाच्या नेत्यांपैकी एक आहेत. ते भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारी समितीचे सदस्यही आहेत. ते केरळचे प्रभारी देखील होते.

## फर्निचर गोडाऊनला आग
## पाच जणांचा मृत्यू



■ **वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. १८ :**
नेवासा फाटा रस्त्यालगत अहिल्या नगर समोर असलेल्या कालिका फर्निचर या मयूर रासने यांच्या दुकानाला लागलेल्या भीषण आगीत रासने कुटुंबातील पाच जणांचा गुदमरून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना सोमवारी मध्यरात्री घडली.

दुकानाच्या मागील गोडाऊन जवळ आणि वरच्या मजल्यावर राहणारे मयूर अरुण रासने (वय ४५), पत्नी पायल (३८), मुलगा अंश (१०), मुलगा चैतन्य (७) आणि आजी सिंधुताई चंद्रकांत रासने (८५) हे झोपेतच गुदमरून मृत्युमुखी पडले. यश किरण रासने (२५) हा गंभीर जखमी आहे.

प्रचंड आगीमुळे निर्माण झालेला धूर थेट घरात शिरल्याने ही घटना घडल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. अग्निशमन दलाने आग नियंत्रणात आणली असून नेमके कारण समजलेले नाही. मध्यरात्रीची वेळ असल्याने कुणालाही बचावकार्य करण्याची संधी मिळाली नाही. या दुर्दैवी घटनेने नेवासा परिसरात शोककळा पसरली आहे.












# सर्व धर्मातील लोकांना मंत्रिमंडळात काम करण्याची संधी : अजित पवार



**सांगली :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारावर चालणारा पक्ष असून यामुळे सर्व धमार्तील लोकांना मंत्रिमंडळात काम करण्याची संधी दिली असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. मिरजेतील संजय भोकरे इन्स्टिट्यूटच्या मैदानावर राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा शनिवारी सायंकाळी झाला. या मेळाव्यास जिल्ह्याच्या विविध भागांतून पक्ष कार्यकर्त्यांनी हजेरी लावली. यावेळी आमदार इद्रिस नायकवडी, जिल्हाध्यक्ष निशिकांत भोसले-पाटील, शहर जिल्हाध्यक्ष प्रा.पद्माकर जगदाळे, माजी आमदार विलासराव जगताप, राजेंद्रअण्णा देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी सभापती तमणगोंडा रवि पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, आम्ही सुसंस्कृत राजकारण्यांचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे काम करत आहोत. जातीय सलोखा राहिला पाहिजे यासाठी सर्व धमार्तील नेत्यांना मंत्री पद देण्यात आले. तसेच जिल्ह्यात अल्पसंख्याक समाजालाही आपल्या पक्षाबद्दल आस्था आहे. त्यांचेही प्रश्न विधिमंडळात मांडण्याची संधी मिळावी यासाठीच इद्रिस नायकवडी यांना विधान परिषदेत काम करण्याची संधी दिली आहे.

# ५ हजार कोटींच्या जमिनीवरून खळबळ

## रोहित पवारांचा संजय शिरसाठ यांच्यावर थेट बोट



**मुंबई** : नवी मुंबईत तब्बल ५ हजार कोटींच्या जमिनीच्या प्रकरणावरून प्रचंड राजकीय खळबळ उडाली आहे. ही जमीन मूळची गरीब व स्थानिक भूमिपुत्रांसाठी सिडकोमार्फत घरकुल प्रकल्पाकरिता राखीव होती. मात्र, सिडकोचे अध्यक्ष पदावर आल्यानंतर पहिल्याच बैठकीत मंत्री संजय शिरसाठ यांनी ही जमीन बिवलकर कुटुंबाला बहाल केली, असा गंभीर आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. इतिहास उलगडत पवार म्हणाले–मराठा साम्राज्याविरोधात ब्रिटीशांना मदत केल्याबदल्यात ब्रिटिशांनी बिवलकर कुटुंबाला सुमारे ४ हजार एकर जमीन दिली होती. नंतर ती सरकारजमा झाली. अनेकदा प्रयत्न करूनही बिवलकर कुटुंबाला जमीन मिळाली नव्हती. पण शिरसाठ यांनी नियम बाजूला सारून केवळ १५ एकर जमीन त्यांच्या घशात घातली, जी आजच्या बाजारभावानुसार ५ हजार कोटी रुपयांची आहे. रोहित पवार यांचा सवाल थेट होता–एकीकडे ५ हजार भूमिपुत्र वषार्नुवर्षे जमिनीसाठी भटकत आहेत, त्यांना काही मिळत नाही.

# निवडणूक आयोगाची मंत्र्यांकडे शपथपत्र मागण्याची हिंमत आहे का?

## संजय राऊत यांचा पलटवार



**मुंबई** : निवडणूक आयुक्त हे भाजपच्या हस्तकाप्रमाणे वागत आहेत. ज्या भाजप पक्षासाठी ते वकिली करत आहेत, त्याच पक्षाच्या अनुराग ठाकूर आणि अन्य काही लोकांनी देखील राहुल गांधींप्रमाणेच आरोप केले असल्याचे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. कोणत्या मतदार संघात किती लाख मतांची चोरी झाली? किती डुप्लिकेट मते आली? असाच आरोप त्यांनी केला आहे. अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाची केंद्रीय मंत्र्यांकडे शपथपत्र मागण्याची हिंमत आहे का? हे त्यांनी सांगावे? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. निवडणूक आयोगाने काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याकडे शपथपत्र मागितले आहे. यावरुन संजय राऊत यांनी आयोगावर पलटवार केला आहे. केंद्राचा मंत्री स्वतः मतदार यादीमध्ये घोटाळा झाला असल्याचे कबूल करत आहे. त्यामुळे सर्वात आधी निवडणूक आयोगाने अशा केंद्रीय मंत्र्यांकडे प्रतिज्ञापत्र मागायला हवे. राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या एकाही प्रश्नाला निवडणूक आयोगाने उत्तर दिलेले नसल्याचा आरोप देखील संजय राऊत यांनी केला.

# ठाकरे बंधु एकत्र आलेल्या निवडणुकीत विजयासाठी पैशांचे वाटप

## संदीप देशपांडे यांचा आरोप



**मुंबई** : उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधु एकत्र आलेल्या पहिल्याच निवडणुकीत विजयासाठी महायुती पैशांचे वाटप करत असल्याचा आरोप मनसे नेते संदीप देशपांडे यांनी केला आहे. त्यामुळे आधीच महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या या निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशीच खळबळ उडाली आहे. या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया सुरु असतानाच हा गंभीर अरोप समोर आला आहे. हे आरोप करताना देशपांडे यांनी पैशांचा लिफाफा देखील पत्रकारांना दाखवला आहे. द बेस्ट एम्प्लॉइज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीच्या मतदानाच्या आदल्या दिवशी मतदारांना सहकार समृद्धी पॅनलच्या वतीने बंद लिफाफ्यातून पैसे पाठवण्याची आरोप मनसे नेते संदीप देशपांडे यांनी केला आहे. याबाबत त्यांनी पाठवण्यात आलेली लिफाफे हे देखील प्रसारमाध्यमांसमोर सादर केले. एकीकडे मतदान सुरू असताना दुसरीकडे पैसे वाटपाच्या झालेल्या आरोपांमुळे आता एकच खळबळ उडाली आहे.

# मुख्यमंत्र्याकडून राज्यातील पावसाचा आढावा

## मराठवाड्यात ८०० गावे बाधित, कोकण व विदर्भात रेड अलर्ट जारी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कंट्रोलमधून राज्यातील पावसाच्या परिस्थितीचा आढावा घेतला. राज्यभरातील जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. संपूर्ण महाराष्ट्रात 4 लाख हेक्टर पिके पावसामुळे बाधित झालेली आहेत. यवतमाळ, नांदेड, वर्धा, बीड, वाशीम या परिसरात जास्त नुकसान झालेले आहे. नुकसानग्रस्त भागातील उपाययोजनांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आलेले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील काही भागात अतिवृष्टी होत आहे. 18 ऑगस्ट ते 21 ऑगस्ट दरम्यान विविध भागांत पुन्हा अतिवृष्टी होण्याचा अंदाज आहे. विशेषतः 15-16 जिल्ह्यांमधील काही जिल्ह्यात रेड तर काही जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट आहे. अशा जिल्ह्यांमध्ये पुढील व्यवस्था योग्यप्रकारे व्हावी, यादृष्टीने प्रयत्न चाललेला आहे.

कोकण विभागात जास्तीत जास्त रेड अलर्ट आहे. जगबुडी, अंबा, पुंडलिका या नद्या इशारा पातळीपर्यंत पोहोचलेल्या आहेत. त्यामुळे कोकण विभागात अधिक लक्ष देत आहोत. मागील काही वर्षांपासून वसिष्ठी नदीमुळे चिपळूणमध्ये मोठ्या प्रमाणात पूर येतो. त्यामुळे वसिष्ठी नदीच्या पातळीवर लक्ष ठेवून आहोत. आवश्यकता भासल्यास उपाययोजनांची तयारी करण्यास प्रशासनाला सांगितले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

नाशिक विभागात तापी आणि हतनूर नदीची पाणी पातळी वाढल्यामुळे रावेर भागातील परिसरात पाणी शिरले आहे. नाशिक विभागात जळगाव जिल्ह्याला सर्वाधिक तडाखा बसलेला आहे. गेल्या दोन-तीन दिवसांत त्या ठिकाणी अतिवृष्टी झाली. यात घरांचे आणि पशुधनाचे नुकसान झाले असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पुणे विभागातील सगळ्या धरणांमध्ये चांगले पाणी आहे. कुठलेही धरण इशारा पातळीवर नाही. विशेषतः अलमाटी धरणाचा धोका कोल्हापूरला होऊ शकतो. त्यादृष्टीने कर्नाटक सरकारशी सातत्याने चर्चा चाललेली आहे. आपले एक इंजिनियर तिथे बसवलेले आहेत, ते 24 तास संपर्कात असतात. सध्या तरी तिथे 524.3 मीटर पातळी राखलेली आहे. त्या पातळीत धोका संभावत नाही. पण पाऊस वाढल्यानंतर पातळी वाढू नये, त्यांनी तो विसर्ग केला पाहिजे. यादृष्टीने त्यांच्याशी आपण चर्चा करत आहोत.

हिप्परगीच्या बॅक वॉटरमुळे आपल्या भागात परिणाम होतो. हिप्परगी जवळपास पूर्णपणे भरलेले आहे. त्यातूनही विसर्ग करावा, अशी विनंती कर्नाटक सरकारला केलेली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पुणे विभागातील कोल्हापूर-सातारा घाटाच्या भागात मोठ्या प्रमाणात रेड अलर्ट आहे. या भागात पावसाची तीव्रता मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतेय, असेही ते म्हणाले.

छत्रपती संभाजीनगर विभागात बीड, लातूर आणि नांदेड या परिसरात मोठ्या प्रमाणात पूरस्थिती आहे. गेले दोन आणि पुढील तीन दिवस बीड, लातूर आणि नांदेड येथे पूरस्थिती संभावित आहे. नांदेड जिल्ह्यात मुखेडमधील मुक्रीमाबाद येथे 206 मिमी पाऊस पडला. पाच लोक बेपत्ता झाले. दीडशे पेक्षा जास्त जनावरे वाहून गेल्याची किंवा मृत्यू झाल्याची संभावना आहे. त्या ठिकाणी खूप लोक अडकले होते. एनडीआरएफ, एसडीआरएफचे पथक पाठवलेली आहेत. रामणगाव येथून 226 लोकांना बाहेर काढले आहे. अजून 3 गावातील लोकांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. पावसाची तीव्रता कमी झाल्यामुळे लोकांना बाहेर काढता येत आहे.

या तीन जिल्ह्यांतील 800 गावे पावसामुळे बाधित झालेली आहेत. 1 लाख हेक्टर शेतीचे नुकसान झालेले आहे. तेलंगाणील श्रीराम सागर धरणाचा विसर्ग कमी करण्यास विनंती केली. आपल्याला विनंतीला मान देऊन त्यांनी एक लाख क्युसेक्सवरून 75 हजार पर्यंत कमी केलेला आहे. इसापूर आणि विष्णुपुरी धरणे देखील इशारापातळीकडे चाललेली आहेत. त्यामुळे तेथील विसर्ग देखील वाढवलेला आहे.

नागपूर विभागात चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये पुढील दोन तीन दिवसांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केलेला आहे. सध्या तरी खूप पुराची स्थिती नाही. पण दक्षिण गडचिरोलीमध्ये थोडी पूरसदृश्य स्थिती निर्माण होत आहे. पुढील दोन दिवसांत पावसाची परिस्थिती वाढू शकते. त्यादृष्टीने देखील सरकार लक्ष ठेवून असून, आवश्यक त्या व्यवस्था तिथे केल्या आहेत.

अमरावतील विभागातील अकोल्यात पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली होती. विशेषतः मूर्तिजापूर आणि पातूर येथे अजूनही मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू आहे. पण बाकी परिसरातील पाऊस कमी झाल्यामुळे पूरसदृश्य परिस्थिती कमी होत आहे. चांदूर रेल्वे, तिवसा, मेहकर, वाशिम, उमरखेड, महागाव, जरी जांमणी, पूसद या सर्व भागात पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विशेषतः शेतीचे नुकसान झाले आहे. दोन लाख हेक्टरच्यावर शेतीचे नुकसान या भागात झाले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे.

मुंबईमध्ये आज सकाळी सात वाजेपूर्वीच्या 48 तासांत जवळपास 200 मिमी पाऊस पडला. आज सकाळी सहावाजेपासून आतापर्यंत 6 ते 8 तासांत 170 मिमी पाऊस पडला. चेंबूर भागात सर्वाधिक 177 मिमी पाऊस पडला. यावर्षी शहर भाग आणि पूर्वी उपनगर भागात पावसाचा जोर अधिक दिसतोय, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

एकूण 14 ठिकाणी पाणी तुंबल्याची स्थिती निर्माण झाली आहे. यामध्ये दोन ठिकाणी वाहतूक पूर्णपण ठप्प झाली. इतर ठिकाणी वाहतूक सुरळीत सुरू आहे. रेल्वे वाहतूक देखील कुठेही पूर्णपणे बंद झालेल्या नाहीत. पण पावसामुळे ती धिमी झालेली आहे. काही ठिकाणी थोडा वेळ थांबून गाड्या पुढे गेलेल्या आहेत. त्यामुळे रेल्वे उशिरा धावत आहेत.

मात्र, रेल्वे कुठेही थांबलेल्या नाहीत, असे मुख्यमंत्री म्हणाले. आज संध्याकाळी सहा-साडेसहानंतर समुद्रात किमान तीन मीटरच्या लाटा असतील.

# आ. खोतकर यांची सीए गोविंदप्रसाद मुंदडा यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

■ **महासागर प्रतिनिधी, जालना, दि. १८ :**

माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी नुकतीच सीए गोविंदप्रसाद मुंदडा यांच्या निवासस्थानी सोमवार दि. 18 ऑगस्ट रोजी सदिच्छा भेट दिली. या वेळी भक्तामल प्रवक्ते किशोर तिवारी, सामाजिक कार्यकर्ते मेघराज चौधरी आदी उपस्थित होते.



प्रारंभी मुंदडा परिवाराच्यावतीने सीए गोविंदप्रसाद मुंदडा व सीए आकाश मुंदडा यांनी शाल व श्रीफळ देऊन आ. खोतकर यांचे स्वागत केले. या प्रसंगी बोलताना आ. खोतकर म्हणाले की, लढा परिवाराशी आपले पूर्वीपासूनच कौटुंबिक संबंध आहेत. या भागातील नागरिकांच्या कोणत्याही समस्या दुर्लक्षित राहणार नाहीत. त्या माज्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, मी त्यांचे तात्काळ निवारण करण्यासाठी प्रयत्नशील राहीन. समाजातील प्रत्येक घटक सुखरूप आणि समाधानात राहावा, हेच माझे ध्येय आहे. सामान्य माणसांच्या अडचणी दूर करण्यासाठी मी सदैव उपलब्ध असल्याचे ते म्हणाले.

सीए गोविंदप्रसाद मुंदडा यांनी आ. खोतकर यांच्या या भेटीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आ. खोतकर यांची लोकाभिमुख कार्यपद्धती समाजासाठी प्रेरणादायी आहे. शैक्षणिक, व्यावसायिक व सामाजिक क्षेत्रातील समस्यांवर त्वरित उपाय शोधण्याची त्यांची दूरदृष्टी कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले.

# पिसाळलेल्या कुत्र्याचा १४ जणांना चावा

■ **महासागर प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर, दि. १८ :**

पिसाळलेल्या कुत्र्याने रविवारी सिडको एन-7 परिसरात 14 जणांना चावा घेतला. घटनेमुळे या भागात या कुत्र्याची दहशत पसरली आहे. नागरिकांनी जखमींना उपचारासाठी घाटीत दाखल केले. दरम्यान, पिसाळलेल्या कुत्र्याला पकडण्यासाठी मनपाच्या पशुसंवर्धन विभागाला माहिती देऊन रात्री उशिरापर्यंत पथक पोहोचलेले नव्हते. त्यामुळे हा कुत्रा अजूनही मोकाट आहे. एन-७ मधील मुकुल मंदिर परिसरात दुपारी ४ वाजता पिसाळलेला कुत्रा नागरिकांना चावा घेत सुटला. यामध्ये लहान मुले, महिला आणि ज्येष्ठांचा सहभाग आहे. चावा घेतलेल्यांची संख्या १४ जणांवर जाऊन पोहोचली. नागरिकांना काही कळण्याच्या आतच तो दुसऱ्याला चावा घेऊन पळून जात होता.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या पुढाकाराने

# चिमुकल्या देवांशीवर शस्त्रक्रिया

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या मदतीतून वाशीम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यात राहणाऱ्या सात वर्षीय देवांशी रवींद्र गावंडे हिच्यावर नुकतीच यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली.

ही महागडी शस्त्रक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने पार पडल्याचे समाधान मुलीच्या पालकांनी व्यक्त केले.

रवींद्र गावंडे (रा. वरूड बु.) यांच्या मुलीला जानेवारी २०२५ मध्ये तीव्र पोटदुखीचा त्रास होत होता. मुलीची अकोला आणि त्यानंतर नागपूर येथे वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी तिचे यकृत गंभीर स्वरूपात बाधित झाल्याचे निदान केले. तसेच तिचे यकृत तातडीने प्रत्यारोपण करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. शस्त्रक्रियेसाठी सुमारे १५ लाख रुपयांचा खर्च सांगण्यात आला.

भाजीपाला विक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या देवांशीच्या वडिलांसमोर एवढी मोठी रक्कम गोळा करण्याचा पेच निर्माण झाला होता. दरम्यान, मुलीच्या वडिलांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती मिळताच या कक्षाकडे त्यांनी मदत मागितली. याशिवाय सोशल मीडियावर मदतीकरिता आवाहन केले. कक्षाच्या पुढाकाराने देवांशीवर पुढील उपचार मुंबईतील वाडिया हॉस्पिटलमध्ये सुरू झाले. या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष, टाटा ट्रस्ट, सामाजिक संस्था तसेच गावकऱ्यांच्या वर्गणीतून आर्थिक मदत उपलब्ध झाली.

देवांशीला तिची आई मीनाक्षी गावंडे यांनी यकृताचा भाग दिला. त्यातून मुलीवर ७ जुलै २०२५ रोजी यकृत प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. आता देवांशीची प्रकृती स्थिर असून तिच्या प्रकृतीत दिवसेंदिवस सुधारणा होत आहे. नुकताच ३ ऑगस्ट रोजी पालकांनी तिचा वाढदिवस साजरा केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष आणि टाटा ट्रस्टच्या मदतीमुळेच आपल्या मुलीला पुनर्जीवन मिळाल्याचे समाधान देवांशीच्या पालकांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून प्रत्येक गरजू, गरीब रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत यासाठी कक्षाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे. देवांशी त्याचेच एक उदाहरण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा कक्ष काम करत असून राज्यातील गरीब व गरजू रुग्णांना मदत करण्यासाठी कक्ष तत्पर आहे.

# पाण्याचा अंदाज न आल्याने चारचाकी वाहून गेली

■ **महासागर प्रतिनिधी, बीड, दि. १८ :**

परळी जवळ असलेल्या कवडगाव ते शिरसी मार्गावर असलेल्या लिंगी नदीला आलेल्या पुरात चारचाकी गाडी वाहून गेल्याची घटना रात्री साडेअकराच्या दरम्यान घडली होती. या गाडीतील तिघांना वाचविण्या यश आले असले तरी एकाचा मृत्यू झाला आहे. विशाल बल्लाळ वय २३ असे मृत व्यक्तीचे नाव आहे.



चारचाकी वाहन पाण्यात वाहून गेल्यानंतर बचाव कायार्ला रात्री १२ च्या सुमारास सुरुवात करण्यात आली. पुण्याहून दिग्रसकडे लग्न समारंभासाठी जात असलेल्या कारला कवडगाव हुडा शिवारातील तेलसमुख रोडवर असलेल्या लिंगी नदीवरील पुलावर पाण्याचा अंदाज न आल्याने चार चाकी गाडी वाहून गेली. या गाडीमध्ये अमर पोळ (वय २५ वर्षे), राहुल पोळ (वय ३० वर्षे), राहुल नवले (वय २३ वर्षे) व हे रात्री गाडी वाहून गेल्याने पाण्यात अडकले.

परळीचे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, पोलीस उपाधीक्षक अंबाजोगाई ऋषिकेश शिंदे यांच्यासह शिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक गौरक्षनाथ दहिफळे यांनी बचाव कार्य सुरू केले. तिघांना वाचविण्यात यश आले. एकाचा मृत्यू झाला आहे.

# प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसला भीषण आग

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १८ :**

पुणे शहरात मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर नऱ्हे परिसरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या एका बसला भीषण आग लागली. या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली आहे. बसमधील सर्व प्रवासी वेळीच बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली असून सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही अशी माहिती पोलिसांनी दिली.

संबंधित बाह्यवळण मार्गावरुन सोमवारी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास प्रवासी बस जात होती. नऱ्हे परिसरातील श्री स्वामी नारायण मंदिराजवळ धावत्या बसमधून अचानक मोठ्या प्रमाणात धूर येण्यास सुरुवात झाली. बसचालकाच्या निदर्शनास हा प्रकार वेळीच आला. बसमधील वाहकाने त्वरीत गाढ झोपेत असलेल्या प्रवाशांना जागे केले. बसला आग लागल्याची माहिती मिळताच बसमधील प्रवासी घाबरले. बसमधील प्रवासी त्वरीत गडबडीत बसमधून बाहेर पडल्याने गोंधळ उडाला. बसमधील चालक आणि वाहकाने प्रवाशांनी उतरण्यासाठी यावेळी मदत केली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली. सिंहगड रस्ता अग्निशमन केंद्राचे प्रमुख प्रभाकर उमराटकर यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी पाण्याचा मारा करुन आग थोड्याच वेळात आटोक्यात आणली.

# लेंडी धरणावरील घळभरणी

■ **महासागर प्रतिनिधी, नांदेड, दि. १८ :**



९ गावांमध्ये प्रचंड हानी

मुखेड तालुक्याच्या काही भागांत रविवारी रात्री तुफान पाऊस झाल्यानंतर वेगवेगळ्या गावांमध्ये सोमवारी सकाळपासून आपत्ती निवारण पथक व महसूल यंत्रणेकडून मदतकार्य सुरू झाले. या अतिवृष्टीत लेंडी धरणाच्या बुडीत क्षेत्रातील ९ गावांना जबर तडाखा बसल्यानंतर अलीकडे या धरणावर सुरू झालेल्या घळभरणीच्या कामामुळे आपत्ती ओढविली आणि प्रचंड हानी झाली असल्याचे त्या भागातील कार्यकर्ते राजीव पाटील रावणगावकर यांनी सांगितले.

शासन दप्तरी वरील गावांचे पुनर्वसन झाल्याची नोंद असली, तरी गेल्या मे महिन्यात धरणावरील घळभरणीचे काम सुरू होण्यापूर्वी प्रकल्पग्रस्तांनी त्यास हरकत घेतली होती. अनेक कुटुंबांना पुनर्वसनाच्या ठिकाणी घरे बांधता आली नाहीत. त्यांनी संबंधित यंत्रणेकडे मुदत मागितली होती. संबंधित गावांतील लोकांचे स्थलांतर झाल्याशिवाय घळभरणीचे काम सुरू करू नका, अशी विनंती तेव्हा करण्यात आली. पण प्रशासनाने आम्हाला दाद दिली नाही, असा आरोप रावणगावकर यांनी केला. एकंदर घटना नैसर्गिक आपत्तीची असली, तरी प्रशासकीय असंवेदनशीलतेमुळे वरील गावांतील अनेक कुटुंबांना अतिवृष्टी तसेच गावांमध्ये शिरलेल्या पाण्याचा तडाखा बसल्याचे सांगितले जात आहे.

मुखेड येथून मिळालेल्या माहितीनुसार या तालुक्यातील रावणगाव, दोन्ही भाटापूर, भासवाडी, हसनाळ, भेंडेगाव, रावी, भिंगोली, कोळनूर इत्यादी गावे रविवार-सोमवारदरम्यानच्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर बाधित झाली. लेंडी प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता विवेकानंद तिडके यांनी दिलेल्या माहितीनुसार अवघ्या ५-६ तासांत सुमारे सव्वादोनशे मि.मी. पाऊस झाला.

तसेच लातूर, उद्गीर आणि कर्नाटक भागातून मोठ्या प्रमाणावर पाणी आल्यामुळे लेंडी नदीच्या पाणी पातळीत ८ मीटरने वाढ झाल्यामुळे वरील गावांमध्ये पाणी शिरले. घळभरणीचे काम सुरू करण्यापूर्वी आवश्यक त्या पूर्वसूचना देण्यात आल्या होत्या, असे तिडके यांनी स्पष्ट केले असले, तरी राजकीय आणि प्रशासकीय पातळीवरील घाईगडबडीमुळे लेंडी धरणाच्या बुडीत क्षेत्रांतील गावांना मोठा तडाखा बसल्याचे दिसून आले. रविवारच्या मध्यरात्रीनंतर मुखेड तालुक्याच्या काही भागात अचानक ढगफुटीसदृश पाऊस झाल्यानंतर वेगवेगळ्या गावांमध्ये निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची माहिती सोमवारी सकाळी जिल्हा मुख्यालयी प्राप्त होताच वेगवेगळ्या विभागांच्या यंत्रणा सक्रिय झाल्या. मुखेड मतदारसंघाचे आमदार डॉ.तुषार राठोड रविवारी मुंबईकडे रवाना झाले होते. आपल्या मतदारसंघातील परिस्थितीची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तहसीलदार व इतर अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. नांदेडचे खासदार प्रा.रवींद्र चव्हाण सोमवारी सकाळीच मुखेड तालुक्यातील पूर परिस्थिती आणि आपत्तीची पाहणी करण्यासाठी रवाना झाल्याचे सांगण्यात आले.

# ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना कोहिनूर रत्न पुरस्कार

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १८ :**

वयाच्या ८२ व्या वर्षी असलेला खणखणीत आवाज, तितक्याच लख्ख आठवणी आणि चित्रपटांच्या शुटींग दरम्यानच्या किस्स्यांमधून उलगडलेला जीवनपट अशा चैतन्यदायी वातावरणात 'त्या आल्या, त्या बोलल्या आणि त्यांनी जिंकले' असा अनुभव पुणेकर रसिकांनी घेतला.




निमित्त होते पूना गेस्ट हाऊस स्नेहमंच, कोहिनूर कट्टा आणि विदिशा विचार मंच यांच्यातर्फे आयोजित 'कोहिनूर रत्न' पुरस्कार प्रदान सोहळ्याचे. अण्णाभाऊ साठे सभागृहात आयोजित या कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना कोहिनूर ग्रुपचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते 'कोहिनूर रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पूना गेस्ट हाऊस स्नेहमंचचे प्रमुख किशोर सरपोतदार, विदिशा विचार मंचच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी, आर.जे.अनिरुद्ध चावला आणि प्रसिध्द गायक जितेंद्र भुरूक उपस्थित होते.

यावेळी लोकमान्य मल्टीपर्पज सोसायटीचे सुशील जाधव, द नेचर ड्रीम प्रोजेक्टचे सुशील देशमुख आणि के ९ चे राजेंद्र वर्मा आणि जयश्री वर्मा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांच्याशी आर.जे.अनिरुद्ध यांनी प्रकट मुलाखतीव्दारे संवाद साधला. त्यातून आशा पारेख यांच्या चित्रपट कारकिर्दीसह त्यांच्या संपूर्ण जीवनाचा अनोखा पट रसिकांसमोर उलगडला. यावेळी बोलताना आशा पारेख म्हणाल्या की, वयाच्या १६ व्या वर्षी मिळालेली मुख्य भूमिका मला आजही आठवते. त्यावेळी मिळालेले अकरा रुपये मानधन आजही माज्या लक्षात आहे. चित्रपटातील माझे पहिले हिरो शम्मी कपूर हे शुटिंग दरम्यान माझी खूप काळजी घ्यायचे. त्यावेळी मला लिपसींग येत नव्हते म्हणून मी त्यांना कॉपी केले. अर्थात ते त्यांना अजिबात आवडले नाही, म्हणून त्यांनी मला प्रेमाने दटावले. तसेच देव आनंद यांचे फॅन क्लब मोठे होते. मला अनेक चांगल्या अभिनेत्यांबरोबर काम करता आले. त्या सगळ्यांशी माझी केमिस्ट्री चांगली होती. मी कायम शिकण्याच्या भूमिकेत राहिले, कारण प्रत्येक व्यक्तीची स्वतःची कौशल्ये असतात.चांगल्या व्यक्तींबरोबरच्या सहवासातून आपण घडत जातो.

यावेळी आशा पारेख यांना पुरणपोळी आवडते हे लक्षात ठेवून पूना गेस्ट हाऊसचे किशोर सरपोतदार आणि साधना सरपोतदार यांनी पारेख यांना पुरणपोळी भेट दिली, तेव्हा त्यांना आश्चयार्चा सुखद धक्का बसला.

महासागर ●मंगळवार,दि.१९ ऑगस्ट २०२५

# अकोला

पान 3





# राज राजेश्वर नगरीत पारंपरिक कावड व पालखी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

## ▪कावड उत्सवामध्ये २०० च्या वर कावडी मंडळांनी घेतला सहभाग ▪१४० पालख्या उत्साहात झाल्या सहभागी

▪महाराष्ट्रातील सर्वात मोठा कावड यात्रा महोत्सव ▪मोठमोठ्या कावडींसह पालख्या व कावडी मंडळांनी घेतला सहभाग▪भर पावसात शिवभक्तांमध्ये उत्साह













▪**अकोला :** श्रावण मासातील अखेरच्या सोमवारी अकोला नगरी श्री राजराजेश्वराच्या जयघोषाने दुमदुमून गेली. ८१ वर्षांची अविस्मरणीय परंपरा जपणाऱ्या कावड आणि पालखी सोहळ्याने शहरात भक्तीचा महापूर आणला. जीवनदायिनी पूर्णा नदीचे पवित्र जल कलशात भरून लाखो शिवभक्तांनी आपल्या अदम्य श्रद्धेचे दर्शन घडवले. शहरातील श्री राजराजेश्वर मंदिरावर अक्षरशः भाविकांचा जनसागर लोटला होता. श्रावण महिन्याच्या शेवटच्या – सोमवारी पूर्णा नदीच्या पात्रातूनजल आणून जलाभिषेक महादेवाला करण्याचीअकोल्यातील प्रथा आता लोकोत्सवाचे भव्य स्वरूप धारण करत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही कावडधारी शिवभक्तांचा उत्साह गगनाला भिडला होता. या वर्षी या परंपरेला ८१ वर्षे पूर्ण झाल्याने उत्सवाचे स्वरूप अधिकच भव्य होते. पहाटेपासूनच, लाखो भाविकांनी राजराजेश्वराच्या दर्शनासाठी मंदिराबाहेर लांबच लांब रांगा लावल्या होत्या. सकाळी आलेल्या पावसाने पालखी आणि कावड उत्सवाच्या उत्साहात मोठी भर पडली. अकोला शहरापासून १५ किलोमीटर दूर असलेल्या गांधीग्राम वाघोली येथून शेकडो शिवभक्त मंडळांनी हजारोंच्या संख्येने कावडी आणि पालख्या घेऊन शहरात प्रवेश केला. 'हर्र बोला महादेव, वाघोलीचा सहादेव!' असा अखंड जयघोष करीत भगवी वस्त्रे परिधान केलेले शिवभक्त वेगात धावत राजराजेश्वराच्या दिशेने येत होते.





▪**जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज शहर कोतवाली चौकात कावड पालखीचे पूजन केले. यावेळी पोलीस अधीक्षक अर्जित चांडक, महापालिका आयुक्त सुनील लहाने आदी उपस्थित होते.**

## पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर याचा कावड पालखी उत्सवात सहभाग



**अकोला :** राज्याचे कामगार मंत्री तथा पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज श्रावण सोमवारी श्रीराजराजेश्वर कावड पालखी उत्सवानिमित्त अकोल्याचे ग्रामदैवत श्री राजराजेश्वर मंदिरात दर्शन घेत जलाभिषेक केला, तसेच कावड पालखी उत्सवात सहभागी होत मानाच्या श्री राजराजेश्वर शिवभक्त मंडळाच्या पालखीचे पूजन केले.यावेळी पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अनेक मान्यवर, कावड मंडळाचे सदस्य उपस्थित होते.८० वर्षापासून सर्वधर्म समभावाची शिकवण देणारा कावड उत्सव अकोल्यात दरवर्षी शेवटच्या श्रावण सोम वारी मोठ्या प्रमाणात साजरा होत असतो. हा लोकोत्सव पाहण्यासाठी राज्यभरातील नागरिक सहभागी होतात.स्वातंत्र्याची चळवळ ऐनभरात असताना या परंपरेचा जन्म झाला.अकोला शहराला भीषण पाणी टंचाईला समोर जाव लागलं होते. यावेळी काही युवकांनी पुढाकार घेऊन गांधीग्रामहून पुर्णा नदीचे जल आणून ग्रामदैवत श्री राजराजेश्वराला जलाभिषेक करण्यात आला होता. ही परंपरा अखंड सुरू आहे.



### शिवभक्तांना प्रदान करण्यात आली वैद्यकीय सेवा

स्थानिक श्री राज राजेश्वर ला जल अर्पण करण्यासाठी शेवटच्या श्रावण सोमवारी हजारोंच्या संख्येने शिवभक्त हे जल आणण्यासाठी वाघोली गांधीग्राम येथे जातात त्या सर्व शिवभक्तांना प्राथमिक आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी गांधीग्राम येथे अकोला येथून श्री सत्यसाई मोबाईल मेडिकल केअर युनिट सह गोपाल नागपुरे शिवसेना ओबीसी जिल्हा प्रमुख, डॉ अशोक ओळंबे, डॉ प्रशांत काटोले,रवि देशमाने, अविनाश खुनेरे, प्रभाकर वानखेडे, सुनिल सरोदे,दहिकर यज्ञेश नागपूरे हे प्रामुख्याने उपस्थित राहून वैद्यकीय सेवा दिली आहे.





**अकोल्यातील ऐतिहासिक कावड महोत्सवानिमित्त श्री हरिहर शिवभक्त मंडळ हरिहर मंदिर मानाचे स्थान भव्य दिव्य ऐतिहासिक कावडवर श्री हरीहर शिवभक्त मंडळाच्या कावडीवर विराजमान श्री हरीहर महाराज व श्री खाटू श्याम भगवान यांचे विलोभनीय दृष्य.**

## कावड यात्रेत भीषण दुर्घटना: २० जण जखमी

**अकोला :** गांधीग्रामच्या दिशेने रवाना झालेल्या डाबकी रोड वासी शिवभक्त मंडळाच्या कावड यात्रेतील ट्रॅक्टर ट्रॉली रविवारी रात्री दगडीपुल जवळ उलटून मोठी दुर्घटना घडली. या अपघातात सुमारे १५ ते २० शिवभक्त युवक जखमी झाले असून, त्यांच्यावर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.प्राप्त माहितीनुसार कावड यात्रेतील सर्वात मोठी कावड म्हणून प्रसिद्ध असलेली डाबकी रोडवासी कावड मंडळ वाघोली गांधीग्रामकडे निघाला होता. दरम्यान भीम नगर चौक गुलजारपूरा येथे निसरडा रस्ता असल्यामुळे ट्रॅक्टर दगडी पुलावर जावून आदळला. यामध्ये ट्रॉली मधे असलेले युवक जखमी झाले. सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही. पोलिसांनी व स्थानिक युवकांनी लगेच जखमी युवकांना दवाखान्यात उपचारार्थ भरती केले.घटनेची माहिती मिळताच आमदार रणधीर सावरकर यांनी तत्परतेने घटनास्थळी लक्ष घातले व जखमींना तातडीने उपचार मिळावेत यासाठी GMCH चे अधिष्ठाता डॉ. गजभिये यांना आवश्यक निर्देश दिले. त्यांनी जखमींना औषधोपचार तसेच सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात असेही आदेश दिले.दरम्यान घटनेची माहिती मिळताच भाजप नेते विजय अग्रवाल यांच्यासह विलास शेळके, वैशाली शेळके, सतीश ढगे, जयंत मसने यांनी तातडीने रुग्णालयात जावून जखमींची भेट घेतली.या दुर्घटनेत जखमी



झालेले काही युवकांची नावे – (सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार) अंकित ढोले शुभम कडू,विश्वजीत महले, प्रतीक काशीद, ऋषी गावंडे,यश बडे, वैभव ठाकरे,ओम वाघ, सागर बावस्कर, अमित बकतेरिया, विश्वजीत महल्लेसहा जखमींना ओझोन हॉस्पिटल तर उर्वरित जखमींना जी एम सी रुग्णालय भर्ती केले. के. एस. पाटील व रावणकर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. यातील तीन युवकांची स्थिती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.दरम्यान, आमदार सावरकर यांनी घटनास्थळ व रुग्णालयात भेटी देऊन जखमींच्या प्रकृतीची माहिती घेतली.आमदार रणधीर सावरकर म्हणाले 'अकोल्यातील ही सर्वात मोठी कावड यात्रा असून दुर्दैवाने ही दुर्घटना घडली.

पोलीसही अत्याचाराच्या घटना जगाने अनेकदा पाहिल्या. मद्याच्या नशेत धुंद असलेल्या पोलिसांचे प्रतापही जगाने पाहिले. कोठडीतील मृत्यू कसे होतात हे देखील समोर आले आहे. पण पोलीस दलातील उच्च पदावर असलेला एक पोलीस अधिकारी एका आंदोलकांच्या कमरेत त्याच्या चिमूरड्याच्या समोर लाथ घालतो, हे चित्र पाहून जर समाजमन विचलित होत नसेल किंवा त्याचं त्यांना काहीच वाटत नसेल, तर याचाच अर्थ ती लाथ जनतेच्याच कमरेत घातली गेली असे समजायला हरकत नाही. पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा ताफा अडवून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने संबंधित आंदोलकाच्या कमरेत कुलकर्णी नावाच्या पोलीस उपाधीक्षकाने फिल्मी स्टाईलने लाथ मारली. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, पण लाथ मारणाऱ्याला तातडीने प्रमोशन दिले की काय केले, याची माहिती मात्र नागरिकांना मिळायला तयार नाही. ती लाथ आंदोलकाच्या कमरेत घातली असली तरी मुर्दाड झालेल्या राज्यातील जनतेच्याच कमरेतच बसली.

स्वातंत्र्यदिनानिमित्त पालकमंत्री पंकजा मुंडे जालन्यात आल्या होत्या. यावेळी, उपोषणकर्त्यांनी त्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्यांना अडवले. आंदोलकांना जसा काही अधिकार असतो, तसा पोलिसांनाही असतो त्याबद्दल दुमत नाही. परंतु त्यानंतर पोलीस उप अधीक्षक अनंत कुलकर्णी यांनी संबंधित आंदोलकाच्या कमरेत फिल्मी स्टाईलने लाथ मारली व आपले शौर्य महाराष्ट्राला दाखवून दिले. खरं म्हणजे असा कर्तव्य कठोर अधिकारी नक्षलवादी क्षेत्रात किंवा पाकिस्तानच्या सीमेवर लढायला पाठविला पाहिजे. आता राज्याचे मुख्यमंत्री स्वतः गृहमंत्री आहे. त्यांनी याबाबत आपली भूमिका अजूनही जाहीर केलेली नाही. त्यामुळे कदाचित या कुलकणीर्ला प्रमोशन मिळेल अशी कुत्सित चर्चा राज्यात सुरू झाली आहे. या कुलकर्णी महाशयांनी आंदोलनकर्त्याच्या कमरेत पाठीमागून येऊन लाथ घातली व त्याचा चिमुरडा आपल्या बापाच्या कमरेत बसलेली लाथ हताशपणे पाहत होता हे चित्र महाराष्ट्राला नक्कीच विचलित करणारे ठरले. गुन्हेगारांशी नेहमी हात मिळवणे करणारे, राज्यकर्त्यांपुढे हतबल झालेले व हप्ते खाऊन गब्बर झालेले पोलीस ही प्रतिमा आजही महाराष्ट्रातील पोलिसांची आहे. शूर पोलीस पाहायलाच मिळत नाही. पण कुलकर्णी नावाचा हा शूर पोलीस अधिकारी पाहून महाराष्ट्र मात्र हादरला. जर हा पोलीस अधिकारी एवढाच शूर असेल, तर त्याला बीडमध्ये पाठवून वाल्मीक कराडच्या गँगच्या विरोधात लढाईला पाठविले पाहिजे. तेथील गुन्हेगारांच्या पाठीत मागूनच काय पुढून जरी लाथ मारली तरी कुलकणीर्ला महाराष्ट्र डोक्यावर घेईल.



# जनतेच्या कमरेत बसली 'त्या' पोलिसाची लाथ




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

पोलीस किती जातीयवादी, क्रूर, मित्र नसलेले, अक्षम किंवा भ्रष्ट आहेत? हा विषय वारंवार समाजात चर्चिला जातो. चित्रपटांमध्ये देखील 'पोलीससे ना दोस्ती अच्छी, ना दुश्मनी अच्छी' असे संवाद देखील 'फेमस' झालेले आहेत. त्यामुळेच हे मान्य करावे लागेल की, भारतातील लोकसंख्येच्या शक्तीहीन घटकांवरील 'कुलकर्णी छाप' पोलिसांची क्रूरता ही अनेक दशकांपासूनची वास्तवता आहे.

भारत स्वतंत्र राष्ट्र बनण्यापूर्वीही, आणि आताही गरीब आणि शक्तीहीन लोकांवरील पोलिसांची क्रूरता ही वास्तवता आहे. लोकसंख्येच्या वाढत्या संख्येबरोबरच, मर्यादित संसाधने आणि संधींसाठी लोकांमध्ये होणारा संघर्ष आता अनेक पटींनी वाढला आहे.

अशा प्रकारे सार्वजनिक भ्रष्टाचार, चोरी करणे किंवा जबरदस्तीने पैसे मिळवणे, राजकीय प्रभावाचा गैरवापर करणे, धार्मिक भावना इत्यादी प्रकार अनेक पटींनी वाढले आहेत. त्यासोबतच गुन्हेगारांची संख्या आणि सार्वजनिक ठिकाणी गुन्हेगारी कारवायांचे प्रमाणही प्रचंड प्रमाणात वाढले आहे. सुमारे तीस वर्षांपूर्वी अस्तित्वात नसलेली आणखी एक घटना म्हणजे दहशतवाद.

अशा अवस्थेत पोलिसांचे मानसिक संतुलन बिघडू शकते. असे असूनही जालन्यातील 'कुलकर्णी'ने केलेला 'प्रताप' हा मात्र मनाला पटला नाही. पोलीस हा जनतेचा मित्र असतो अशी जाहिरात केली जाते. 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' हे त्यांचे ब्रीद वाक्य देखील मान्य आहे. परंतु असाह्य अवस्थेतील व्यक्तीला त्याच्या मुलादेखत मारहाण करणे हे कितपत योग्य आहे?

उपोषणकर्ता गोपाल चौधरीने जालना पोलिसांवर गंभीर स्वरूपाचे आरोप केले. त्याचे म्हणणे असे आहे की, माझ्या सासरच्यांनी माझ्या पत्नीचं दुसऱ्याशी लग्न लावून दिलं. यामुळे, मी जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. मात्र, पोलीस पैसे खाऊन गुन्हेगारांना पाठीशी घालत आहेत. तसेच, माझ्या वडिलांना चौकशीसाठी बोलावून मारहाण करतात.

या घटनेतही पोलिसांची फौज आमच्याच अंगावर आली. आरोपींना अटक करा आणि न्यायालयात हजर करा इतकीच आरोपीची मागणी होती. न्याय नाही मिळाला तर आत्मदहन करू, असे त्याचे म्हणणे होते. पोलीस उप अधीक्षक अनंत कुलकर्णी यांचे म्हणणे असे की, जालन्यात आत्मदहन करण्याचा प्रयत्न करताना आंदोलकाने महिला कर्मचाऱ्याच्या अंगावर रॉकेल टाकल्याने बळाचा वापर केला.

गेल्या काही दिवसांपासून गोपाल चौधरी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या पत्नीने दुसरे लग्न केल्याने तिला परत आणावे, अशी मागणी ते करत आहे. यापूर्वी पोलिसांनी त्यांना अनेकदा समजावण्याचा प्रयत्न केला, असा कुलकर्णी दावा करीत असले, तरी ताब्यात घेतलेल्या आरोपीला मारहाण करण्याचा अधिकार या कुलकर्णी नावाच्या शूर (?) अधिकाऱ्याला दिला तरी कुणी?

भारतातील समाज सुमारे तीस वर्षांपूर्वीच्या तुलनेत कितीतरी पटीने जास्त अराजक, असंयमी आणि गुन्ह्यांनी भरलेला आहे. एवढ्या मोठ्या, अराजक आणि अराजक समाजाचे कामकाज चालविण्यासाठी, सत्ताधारी राजकीय वर्ग सतत पोलिस दलाकडे पाहतो. गेल्या तीस वर्षांत पोलिस दलात अनेक पट वाढ झाली आहे.

पोलिस दलात आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली असली तरी, सार्वजनिक क्षेत्रात गुन्हेगारी, दहशतवाद आणि गोंधळ वाढतच आहे आणि ते अनियंत्रित राहिले आहेत. समाजातील या गोंधळाच्या वाढीवर आणि तत्त्वहीन राजकारण्यांकडून हिंसाचाराला चालना देण्यावर नियंत्रण ठेवण्यात आणि दंगली आणि दहशतवादी हल्ल्यांसारखे मोठे गुन्हे सोडवण्यात अयशस्वी झाल्याने, पोलिस कठोर उपाययोजनांचा अवलंब करतात. पण ताब्यात असलेल्या संशयित आरोपीला पाठीमागून पळत येऊन वेगाने लाथ मारण्यात कोणता पुरुषार्थ कुलकर्णी महाशयांनी साधला ?

अशाप्रकारे गेल्या काही दशकांमध्ये पोलिसांची क्रूरता लक्षणीयरीत्या वाढली आहे. महानगरांमध्येही कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. प्रमुख शहरांमध्येही महिलांवर होणारे अत्याचार, बलात्कार, महिलांवरील गुन्हे वाढले आहेत आणि पोलिस त्यांच्यावर नियंत्रण आणू शकत नाहीत.

सार्वजनिक ठिकाणी, धार्मिक मंडळांमध्ये, धार्मिक स्थळांमध्ये, मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये काही कारवाया नियमितपणे घडतात. या कारवायांसाठी जबाबदार असलेल्या गुन्हेगारांना पकडले जाते हे फार कमी प्रकरणांमध्ये घडते.

पोलिसांची वागणूक क्रूर का असते याचे अनेक पैलू आहेत, हे समाजालाही मान्य आहे. अनेकदा कामाचा ताण, प्रशिक्षण, समाजाचा दबाव आणि काहीवेळा वैयक्तिक स्वभाव यांसारख्या घटकांमुळे पोलिसांची वागणूक क्रूर असू शकते. कामाचा ताण सर्वत्र असतोच. त्यांना २४ तास उपलब्ध राहावे लागते आणि अनेक गुंतागुंतीच्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे, काहीवेळा ते चिडचिडे होऊ शकतात आणि त्यांचा राग लोकांवर काढू शकतात.

काहीवेळा पोलिसांना पुरेसे प्रशिक्षण मिळत नाही, ज्यामुळे त्यांना परिस्थिती हाताळण्यात अडचणी येतात. त्यांना लोकांसोबत कसे बोलावे, कसे वागावे याचे योग्य प्रशिक्षण नसल्यास, ते क्रूरपणे वागण्याची शक्यता असते.

समाजातून पोलिसांवर तात्काळ कारवाई करण्याचा आणि गुन्हेगारी रोखण्याचा दबाव असतो. त्यामुळे, काहीवेळा पोलिस कायद्याचे उल्लंघन करून लोकांना शिक्षा देण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे त्यांची वागणूक क्रूर दिसते. काही पोलिसांचा स्वभावच क्रूर असू शकतो. त्यांना लोकांबद्दल सहानुभूती नसते आणि ते आपल्या अधिकाराचा गैरवापर करतात.

काहीवेळा राजकीय दबावामुळे पोलिसांना काही विशिष्ट व्यक्ती किंवा गटांवर अन्यायकारक कारवाई करावी लागते, ज्यामुळे त्यांची प्रतिमा मलिन होते. काहीवेळा कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना कठोर भूमिका घ्यावी लागते, ज्यामुळे त्यांची वागणूक क्रूर वाटू शकते.

पोलिसांच्या क्रूर वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांना योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यांना लोकांसोबत कसे बोलावे, कसे वागावे याचे प्रशिक्षण दिले पाहीजे. पोलिसांवरील कामाचा ताण कमी करणे आवश्यक आहे. त्यांच्यासाठी कामाचे तास निश्चित करणे आणि त्यांना विश्रांतीसाठी पुरेसा वेळ देणे आवश्यक आहे. पोलिसांच्या वर्तनावर लक्ष ठेवण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा असावी. त्यांच्या गैरवर्तनाबद्दल तक्रार करण्याची सोय असावी.

समाजात कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे आवश्यक आहे. लोकांना त्यांच्या अधिकारांबद्दल आणि कायद्याबद्दल जागरूक करणे आवश्यक आहे. पोलिसांची वागणूक क्रूर असण्याची अनेक कारणे आहेत. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. विविध पक्षांकडून पोलिसांना तात्काळ समाधानकारक निकाल देण्याची सक्ती केली जाते, ज्यामुळे अधिकारी त्यांच्या अधिकाराचा अतिरेक करतात आणि त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करून क्रूरपणे वागतात.

पोलिसांच्या ताब्यात असलेल्या आरोपीला पोलिस ज्या पध्दतीने वागवतात, त्यामुळे पोलिसांची प्रतिमा अतिशय मलीन झालेली आहे. त्यांना लोक हरामखोर, भिकारी, वदीर्तील गुंड असे म्हणतात. लोकांच्या अश्या प्रतिक्रिया बघुन वाईटही वाटते. कारण कायद्याच्या रक्षकाला त्याच्याच खात्यातील काही लोकांमुळे मान खाली घालावी लागते.

### सोमनाथ सूर्यवंशींची आठवण झाली

समाजमाध्यमामध्ये ताब्यात घेतलेल्या आरोपीला पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी घेवून निघाले अन् मागच्या बाजूने पळत पळत येवून त्याच्या कमरेत लाथ घालणारा पोलिस उप अधीक्षक दर्जाचा अधिकारी हा प्रकार पाहून महाराष्ट्र हादरला. विशेष म्हणजे अजूनही 'त्या' अधिकाऱ्याची साधी चौकशी देखील झाले नसल्याचे वृत्त आहे. तसे जर असेल तर गृह खात्याचा कारभार कसा चालू आहे याचा अंदाज करायला हरकत नाही. या अशा घटनांमुळेच सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणाची आठवण संपूर्ण महाराष्ट्राला झाली. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायालयीन कोठडीतील मृत्यू प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्याच्या पोलीस महासंचालकांना विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. याचाच अर्थ असा की यापूर्वी पोलिसांनी सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणाची फाईल वासनात गुंडाळून ठेवली होती. या आदेशामुळे महाराष्ट्र सरकारने यापूर्वी नियुक्त केलेली चौकशी समिती बरखास्त झाली. न्यायालयाच्या आदेशानुसार कोठडीतील मृत्यूशी संबंधित सर्व कागदपत्रे नव्याने स्थापन होणाऱ्या विशेष तपास पथकाकडे सोपवल्याने त्या प्रकरणातही असाच कुणीतरी 'कुलकर्णी' सापडल्याशिवाय राहणार नाही. या प्रकरणातील याचिकाकर्त्या विजयाबाई सूर्यवंशी यांच्यावतीने ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी प्रखर युक्तिवाद केला. परभणीत संविधानाच्या प्रतिकृतीचे विद्रुपीकरण झाल्यानंतर शहरात बंद पुकारण्यात आला होता. त्या दरम्यान काही आंदोलकांनी तोडफोड केली. पोलिसांनी तोडफोडीत सहभागी झाल्याच्या संशयावरुन सोमनाथ सूर्यवंशींना अटक केली व पोलीस कोठडीत त्यांचा मृत्यू झाला होता. संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचा हायकोटार्चा आदेश सुप्रीम कोर्टानंही कायम ठेवला आहे. समाज माध्यमांमध्ये 'कुलकर्णी'चा पराक्रम संपूर्ण देशाने पाहिला, नाहीतर अजून एक सोमनाथ सूर्यवंशी प्रकरण झाले असते तरी नवल वाटले नसते!

# कॉंग्रेसमधील अंतर्गत लोकशाहीचे काय?



अभय गोखले

कर्नाटकातील कॉंग्रेसचे नेते आणि सहकार मंत्री के. एन. राजन्ना यांनी कॉंग्रेसला घरचा आहेर दिला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बंगळुरू (मध्य) लोकसभा मतदारसंघातील, महादेवपुरा विधानसभा मतदार क्षेत्रात एक लाख दोनशे पन्नास मतांची चोरी झाल्याचा आरोप नुकताच कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केला होता.

बंगळूरू (मध्य) लोकसभा मतदारसंघातील इतर विधानसभा क्षेत्रांत कॉंग्रेसच्या उमेदवाराला आघाडी मिळाली होती, परंतु महादेवपुरा विधानसभा क्षेत्रात प्रतिस्पर्धी भाजपा उमेदवाराला एक लाख चौदा हजार इतके प्रचंड मताधिक्य मिळाल्याने, इतर विधानसभा क्षेत्रांत आघाडीवर असूनही, कॉंग्रेसच्या उमेदवाराला बंगळूरु (मध्य) लोकसभा मतदारसंघात पराभव पत्करावा लागला, असा आरोप राहुल गांधी यांनी केला होता.

यावर आपले मत व्यक्त करताना, कर्नाटकचे सहकार मंत्री के. एन. राजन्ना यांनी सांगितले की लोकसभा निवडणुकांच्या दरम्यान कर्नाटकात आमचे (कॉंग्रेसचे) सरकार सत्तेवर होते. त्यामुळे मतदार याद्यांकडे व्यवस्थित लक्ष देणे ही आमची जबाबदारी होती. मतदार याद्यांतील अनियमितता आमच्या डोळ्यांसमोर दिसत होती.आम्ही त्यावेळी त्याबाबत आक्षेप घ्यायला हवा होता पण आम्ही डोळे मिटून शांत राहिलो. आता आक्षेप नोंदवण्याऐवजी तेंव्हा आक्षेप नोंदवला असता तर बरे झाले असते.

कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी हे मत चोरी बाबत निवडणुक आयोग आणि भाजपा यांच्यावर आरोप करत असताना आणि संपूर्ण देश ढवळून काढत असताना, त्यांच्या पक्षाची सत्ता असलेल्या कर्नाटक राज्यातील एक मंत्री अशा प्रकारचे वक्तव्य करून, राहुल गांधी यांना अडचणीत आणत असेल तर ती गोष्ट कॉंग्रेसचे नेतृत्व सहन करणे शक्यच नव्हते. कॉंग्रेस नेतृत्वाने कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांना असा आदेश दिला की राजन्ना यांची ताबडतोब मंत्रीमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी.

बिचारे, सिद्दरामय्या ! त्यांनी कॉंग्रेस नेतृत्वाला सांगून पाहिले की विधानसभेचे अधिवेशन सुरू असल्याने, आता राजन्ना यांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी केली तर विरोधी पक्षांच्या हाती आयतेच कोलीत मिळेल, परंतु कॉंग्रेस नेतृत्व आपल्या म्हणण्यावर ठाम राहिल्याने अखेर सिद्धरामय्या यांना नेतृत्वाचे ऐकावे लागले. कारण राजन्ना यांचा अपराध मोठा होता.त्यांनी अशाप्रकारचे वक्तव्य करून राहुल गांधी यांना अडचणीत आणले होते.

अर्थात आपल्या पक्षाला अडचणीत आणण्याचा प्रताप, राजन्ना यांनी पहिल्यांदाच केलेला नाही. राजन्ना हे वाल्मिकी समाजातून येतात. ते मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांच्या अगदी निकटचे मानले जातात. मुख्यमंत्री सिद्दरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांच्यातील संघर्षात, राजन्ना हे सिद्दरामय्या यांची उघडपणे बाजू घेतात. मध्यंतरी त्यांनी जाहीर केले की सिद्दरामय्या हे पूर्ण टर्म मुख्यमंत्रीपदी राहतील. मुख्यमंत्रीपदावरून सिद्दरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांच्यात रस्सीखेच सुरू असताना, राजन्ना यांचे वरील वक्तव्य कॉंग्रेस नेतृत्वाला अडचणीत आणणारे होते.

कॉंग्रेसच्या धोरणानुसार, 'एक व्यक्ती एक पद' याला अनुसरून उपमुख्यमंत्रीपद आणि प्रदेशाध्यक्षपद ही दोन पदे सांभाळणाऱ्या डी के शिवकुमार यांच्याकडून प्रदेशाध्यक्षपद काढून घेऊन ते दुसऱ्या व्यक्तीकडे सोपविण्यात यावे अशी मागणी मध्यंतरी राजन्ना यांनी केली होती.

खरे पाहता मुख्यमंत्रीपदावर दावा करणाऱ्या डी के शिवकुमार यांना खूष ठेवण्यासाठी कॉंग्रेस नेतृत्वाने त्यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद आणि प्रदेशाध्यक्षपद ही दोन पदे आपले धोरण बाजूला ठेवून, सोपवली होती.परंतु राजन्ना यांच्या वरील मागणीमुळे कॉंग्रेस नेतृत्वाची पंचाईत झाली होती.

डी के शिवकुमार यांची बाजू कमकुवत करण्यासाठी मध्यंतरी, राजन्ना यांनी अशी मागणी केली होती की, लिंगायत, अनुसूचित जाती आणि जमाती व अल्पसंख्य समाजातील एकेका व्यक्ती ला उपमुख्यमंत्रीपद देण्यात यावे. याचा अर्थ डी के शिवकुमार यांच्या व्यतिरिक्त आणखी तिघांची उपमुख्यमंत्रीपदी वर्णी लावण्यात यावी.

सप्टेंबर नंतर राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याचे भविष्य वर्तवून राजन्ना यांनी काही दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणात खळबळ माजवली होती.राज्याच्या मुख्यमंत्री पदात बदल होण्याचे संकेत राजन्ना यांनी त्यावेळी दिले होते.

कॉंग्रेस नेतृत्वाने मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांना, तडकाफडकी राजन्ना यांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करण्याचे आदेश दिले,त्यांना राजीनामा देण्यासाठी पुरेसा वेळही दिला नाही. यावरून राजन्ना यांचा अपराध किती मोठा होता, याची कल्पना येते.

लोकशाही वाचवण्यासाठी कॉंग्रेसतर्फे देशभर आंदोलन करण्यात येत आहे. मात्र कॉंग्रेस मधील अंतर्गत लोकशाहीचे काय, असा प्रश्न राजन्ना प्रकरणावरून उपस्थित होतो. खरे पाहता, कॉंग्रेस नेतृत्वाने राजन्ना यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यायला हवी होती. ते चुकीचे बोलले असतील तर त्यांचे म्हणणे खोडून काढायला हवे होते. परंतु तसे न करता,त्यांची तडकाफडकी मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याचे आदेश कॉंग्रेस नेतृत्वाने, मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांना दिले.

राजन्ना हे सिद्दरामय्या यांच्या अगदी निकटचे तर आहेतच शिवाय ते मासबेस असलेले नेते आहेत.लवकरच कर्नाटकात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. राजन्ना यांच्या हकालपट्टीमुळे त्यांच्या प्रभावक्षेत्रात, कॉंग्रेसला फटका बसू शकतो, ही गोष्ट लक्षात घेता, कॉंग्रेस नेतृत्वाला, राजन्ना यांचे प्रकरण अतिशय काळजीपूर्वक हाताळावे लागेल. ■ ■




# अण्णा आता तरी उठा!

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे हे आंदोलनासाठी ओळखले जातात. अशातच पुण्यात अण्णा हजारे यांचा फोटो असलेला एक बॅनर लावण्यात आला आहे. यावर आता तरी उठा अण्णा, मतांची चोरी झाली आहे, असा मजकूल लिहिलेला आहे.

अण्णांना याद्वारे आंदोलन करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र या बॅनरवरून अण्णा हजारे भडकले आहेत. वयाच्या ९० व्या वर्षीही काम करावं का? असा प्रतिप्रश्न अण्णांनी केला आहे.

पुण्यातील या बॅनरबाबत अण्णा हजारे यांना प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना अण्णा म्हणाले की, आतापर्यंत मी भरपूर काम केले आहे. भ्रष्टाचार होऊ नये यासाठी आंदोलने केली आहेत. माझ्यामुळे या देशात दहा कायदे झाले. माहितीच्या अधिकाराचा कायदा माझ्यामुळे मिळाला. देशात मोठ्या प्रमाणात जागृती झाली. माहितीचा अधिकार, दप्तर दिरंगाई, बदलीचा कायदा, लोकपाल, लोकायुक्त असे कायदे माझ्या प्रयत्नांमुळे अस्तित्वात आले आहेत.

पुढे बोलताना अण्णा म्हणाले की, आता माझं वय झालं आहे. मी ९० वर्षांचा झाल्यानंतरही काम करायचे आणि तुम्ही झोपून राहायचे? अशी जर कोणी अपेक्षा करत असेल तर ते चूकीचे आहे. माझ्याकडे बोट दाखविण्यापेक्षा मागच्या काळात मी जे केले ते आजच्या तरुणांनी करावे असं विधान अण्णा यांनी बॅनर लावणाऱ्यांना केलं आहे.

**तरुणांनी आता जागं व्हायला हवं**

तरुणांना सल्ला देताना अण्णा म्हणाले की, आजपर्यंत मी जे केलं, ते आता तरुणांनी करावं. त्यांचं या देशाप्रती कर्तव्य आहे. कारण तेही या देशाचे नागरिक आहेत. फक्त बोट दाखवून हे करा, ते करा म्हणणं चुकीचं आहे. यातून काहीही साध्य होणार नाही. तरुणांनी आता जागं व्हायला हवं असं अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे. दरम्यान, अण्णा हजारे यांनी दिल्लीत २०१२ साली लोकपाल विधेयकासाठी आंदोलन केलं होतं. मात्र त्यानंतर ते आंदोलनांपासून दूर आहेत. ■ ■ ■

### वाचक लिहितात

## महाराणा प्रताप यांच्या ऐतिहासिक वास्तूंना ऊर्जितावस्था येणार

ही बातमी वाचून एक भारतीय नागरिक म्हणून खुप आनंद झाला. उदयपूर जिल्ह्यातील चावंड या गावात सम्राट महाराणा प्रताप यांची समाधी आहे.

या समाधीचा जिर्णोद्धार वर्ष १९९७ मध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी बिहारी वाजपेयी यांच्या हस्ते करण्यात आला.त्यानंतर आजपर्यंत गेल्या २८ वर्षे भारत वा राज्य सरकार कडून समाधीस्थळाची देखरेख व जतन करणे यावर कांहीच खर्च करण्यात आला नाही.

सध्याचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या शासनाने प्रताप सर्किट अभियानांतर्गत महाराणा प्रताप यांच्या ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रथम २०० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली असून पैकी २० कोटी रुपये चावंडांच्या समाधीस्थळासाठी करण्यासाठी आली आहे.चावंड येथील स्थानिक समिती समाधी संभाळण्याचा प्रयत्न करीत आहे. यासाठी राज्य सरकार कौतुकास पात्र आहे.

उदयपूर जिल्ह्यातील राजसमंदज्ञ जिल्ह्यातील कुंभलगड किल्ला हा महाराणा प्रताप यांचे जन्मस्थान आहे. कुंभलगड किल्ल्याची भिंत जगातील दुसऱ्या नंबरची सर्वात लांब भिंत आहे. पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे ह्या किल्ल्याच्या भिंतीची दुर्दशा झाली आहे.

स्वातंत्र्यापासून तर आजपर्यंत महाराणा प्रताप यांच्या किल्ल्याची आणि ऐतिहासिक वास्तूंची स्थिती खालावत चालली आहे. देशात अशा कितीतरी वास्तू आहेत पण त्याकडे पुरातत्त्व विभागाचे आणि सरकारचे लक्षच नाही.

म्हणजे इस्लामिक वास्तुंच्या देखरेख व जतन वर कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यापेक्षाही महाराणा प्रतापांच्या वास्तूंचे जतन व देखरेख करून ते सुस्थितीत ठेवणे कमी महत्वाचे आहे का? हा प्रश्न एक भारतीय नागरिक म्हणून मला पडतो.

देशातील किल्ले, गडकोट पूर्वीच्या शासकांची प्रतीके, राजवाडे हे या देशातील धरोहर आहे. पुढच्या पिढीला आपला दैदिप्यमान इतिहास दाखवायचा असेल तर यांचे जतन करणे गरजेचे आहे.

परंतु याच गोष्टीकडे नेमके दुर्लक्ष केल्या जाते. सरकारे बदलतात पण मानसिकता बदलत नाही. पण आता सुरुवात झाली आहे हेही नसे थोडके.

■ शशिकांत पाध्ये, वर्धा



# तुम्हीही खाता शिळी चपाती? फायदे आणि तोटे जाणून घ्या

भारतीय घरांमध्ये लोक सकाळच्या नाश्त्यात किंवा संध्याकाळच्या चहासोबत शिळी चपाती आवर्जून खातात. ग्रामीण भागात शिळी चपाती अगदी आवडीने खाल्ली जाते. काही लोकांचा असा विश्वास आहे की शिळी चपाती खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात. त्याच वेळी, काही लोक म्हणतात की शिळी चपाती प्रत्येकासाठी फायदेशीर नसते.

आरोग्य तज्ञांचा असा विश्वास आहे की शिळ्या चपातीच्या फायद्यांसोबतच त्याचे काही तोटे देखील आहेत. जसे की ती योग्य पद्धतीने न खाणे, किंवा बरेच दिवस शिळी चपाती खात राहणे किंवा चुकीच्या वेळी खाणे. म्हणून जर तुम्हीही शिळी चपाती खात असाल तर हा लेख तुमच्यासाठी आहे.

आहारतज्ज्ञ शिखा गुप्ता म्हणतात की, आयुर्वेद असो किंवा वैद्यकीय शास्त्र, दोन्हीही म्हणतात की अन्न नेहमीच ताजे खावे. जेव्हा तुम्ही अन्न शिजवून बाहेर ठेवता किंवा काही काळासाठी ठेवता तेव्हा ते शिळे होऊ लागते.

अशा परिस्थितीत हवेत असलेले बॅक्टेरिया, बुरशी अन्नाला दूषित करतात. चपातीच्या बाबतीतही असेच आहे. हवेत असलेले हे बॅक्टेरिया हळूहळू चपातीच्या आत जातात आणि जेव्हा तुम्ही शिळी चपाती खाता तेव्हा त्याचे फायदे कमी आणि नुकसान जास्त होते.

पण १ ते २ दिवस शीळी चपाती खाल्ल्याने तुम्ही आजारी पडणार नाही. पण जर तुम्ही दररोज शिळी चपाती खात असाल तर मात्र याचा आरोग्यावर नक्कीच परिणाम करेल.

**शिळी चपाती खाण्याचे फायदे**

आयुर्वेदात, शिळी चपाती खाण्याचे फायदेही सांगितले गेले आहेत. असे म्हटले जाते की शिळी चपाती खाल्ल्याने रक्तातील साखर नियंत्रित राहते. त्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते.

पोटाच्या समस्या असलेल्या लोकांसाठीही शिळी चपाती खाणे फायदेशीर आहे. त्यामुळे पोटात जळजळ, आम्लपित्त आणि आंबटपणा यापासून आराम मिळतो. शिळी रोटीमध्ये भरपूर फायबर असते, त्यामुळे वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठीही ती फायदेशीर आहे.

**शिळी चपाती खाण्याचे तोटे**

आहारतज्ज्ञांनी सांगितल्याप्रमाणे, शिळ्या चपातीमध्ये बुरशीजन्य आणि बॅक्टेरिया वाढण्याचा धोका जास्त असतो.

अशा परिस्थितीत त्याचा आरोग्यावरही वाईट परिणाम होतो. शिळी चपाती खाल्ल्याने अन्नातून विषबाधा होण्याचा धोका असतो. याशिवाय पोटदुखी, उलट्या आणि पचनाशी संबंधित समस्या देखील उद्भवतात. ■ ■ ■

### अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## सप्तर्षी परिक्रमा

मेहकर परिसरातील
सप्तरुषींच्या स्थळांची
आहे वेगळीच महती
भेट देऊन तर पहा
येईल तुम्हा अनुभूती...

अध्यात्मिक शक्तिंची केंद्रे
आहे ही तपस्वींची तपोभूमी
हजारो भाविक करती परिक्रमा
उर्जाशक्तिची राहत नाही कमी..

दऱ्या खोऱ्यातील श्रावणी दृश्य
नयनांची फेडती पारणे
शारंगधराची घेता भेट
जीवनी राहत नाही काही उणे!

## दि स्टाइल एडिट बॉलीवूड फॅशनिस्टा अनन्या पांडे यांच्याकडून फॅशन अँड ग्लो अप अनुभव, फक्त एअरबीएनबीवर



**नागपूर, १८ ऑगस्ट :** बॉलीवूड फॅशन आयकॉन अनन्या पांडे एक खास, अद्वितीय फॅशन आणि ग्लो अप अनुभव अनन्याज स्टाईल एडिट, फक्त एअरबीएनबीवर आयोजित करण्यासाठी सज्ज आहे. फॅशनप्रेमी, ग्लॅमरचा शोध घेणाऱ्या आणि अनन्याच्या चाहत्यांना त्यांच्या सिग्नेचर स्टाइल विश्वात प्रवेश देण्यासाठी डिझाइन केलेला हा अनुभव जास्तीत जास्त चार पाहुण्यांना उपलब्ध असेल.

दिल्लीतील सर्वात आकर्षक एअरबीएनबीपैकी एक असलेल्या अनन्याच्या स्वप्नातील क्लोसेट आणि व्हॅनिटी स्पेसच्या स्वप्नातीतल आवृत्तीत राहण्याची संधी चाहत्यांना मिळेल. तिच्या वॉक-इन वॉर्डरोबपासून ते व्हॅनिटी झोनपर्यंत ही जागा पूर्णपणे धमाल फॅशन प्लेग्राउंडमध्ये रूपांतरित झाली आहे.

अनन्यासोबत तिची एक्सपर्ट ए-टीम यात सहभागी होईल. ती चाहत्यांना फायनल ग्लो-अप देईल. त्यांना तिच्या आवडत्या स्टायलिस्टकडून स्टाईल करून घेण्याची संधी मिळेल. तिच्या विश्वासू सौंदर्य टीमकडून ग्लॅमरस लुक मिळेल आणि आवडत्या फोटोग्राफरकडून फोटो काढले जातील. उत्तम ग्लो-अप, भलीमोठी फॅशन ऊर्जा आणि आपणच हिरो असल्याची भावना तुम्हाला उत्साहित करेल.

जेन झीची प्रेरणा असलेल्या अनन्या पांडेसोबत भारतात एअरबीएनबी ओरिजिनल्स आणताना आम्हाला खूप आनंद होत आहे. ओरिजिनल्स ही जगातील सर्वात लोकप्रिय कलाकारांकडून आयोजित केलेली असाधारण अनुभवांची मालिका आहे आणि ती केवळ एअरबीएनबीसाठी डिझाइन केलेली आहे. अनन्याज स्टाईल एडिट हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे. अनन्याची स्टाइल आणि बॉलिवूडप्रेमी देशातील तरुण प्रेक्षकांशी असलेले मजबूत कनेक्शन या सहकार्याला खरोखर खास बनवते. आम्हाला चाहत्यांना तिचे ग्लॅमरस जग जवळून अनुभवण्याची संधी देताना अभिमान वाटतो. त्यातून तिच्याशी जिव्हाळ्याचे, स्नेहमीय आणि अविस्मरणीय नाते तयार होईल, असे एअरबीएनबीचे भारत आणि आग्नेय आशियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत बजाज म्हणाले.

## डेलॉइट इंडियाने साजरा केला पॅरालिम्पिक अभिमान जो सांगतो भारताचे भविष्य



**मुंबई, १८ ऑगस्ट :** मर्यादेपलीकडे जाऊ बघण्याचे स्वप्न बघण्याचे धाडस करणाऱ्या आणि त्यांची क्षमता साकार करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींमुळेच भारताचे भविष्य घडते. विविध प्रतिभांसोबत जोडण्याची आपली वचनबद्धता डेलॉइट इंडियाने आज पुन्हा खरी ठरवली, ज्याचे उदाहरण म्हणजे १८ वर्षीय शीतल देवी, जी आहे जगातील पहिली महिला पॅरा आर्चर जीला हात नाहीत आणि ती पॅरालिम्पीक मेडालिस्ट सुद्धा आहे. इतक्या अडचणी असूनही, १५ व्या वर्षी धनुष्य उचलून, १ व्या वर्षी तिने जागतिक क्रमांक १ पटकावला आणि १७ व्या वर्षी पॅरालिम्पिक कांस्यपदक मिळवले, शीतल सातत्याने अडथळे दूर करत आहे, मर्यादा पार करत आहे आणि ती एक स्वप्न बघण्याचे, चिकाटीने काम करण्याचे आणि ते साकार करण्याचे प्रत्यक्ष उदाहरण बनली आहे.

डेलॉईट साऊथ आशियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोमल शेट्टी म्हणाले, भारताची सर्वात मोठी ताकद म्हणजे भारताचे नागरीक, मोठी स्वप्ने पाहण्याची, आव्हानांवर मात करण्याची आणि शक्यतांना यशात रूपांतरित करण्याची त्यांची क्षमता. येणाऱ्या संधीचे सोने केल्यास काय घडू शकते याचे जीवंत उदाहरण म्हणजे शीतल. डेलॉइट इंडियामध्ये, आमचे ध्येय केवळ भारताच्या प्रगतीचे साक्षीदार होणे नाही तर संधी निर्माण करून, व्यासपीठ तयार करून आणि भारताच्या प्रतिभेला भरभराटीसाठी योग्य मार्ग उपलब्ध करून देऊन महानगरांच्या पलीकडे सक्रियपणे त्यांना सक्षम करणे हे आहे.

शीतल देवी म्हणाली, व्यासपीठापर्यंतचा प्रवास हा फक्त एका व्यक्तीचा नसतो, तर तो तुमच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांचा असतो आणि तुम्हाला उच्च ध्येय गाठण्याचा आत्मविश्वास देणाऱ्यांचा असतो. मी मारलेला प्रत्येक बाण मला आठवण करून देतो की, कोणतेही आव्हान अजिंक्य नसते. माझा प्रवास केवळ माझ्या दृढनिश्चयानेच नव्हे तर माझ्या क्षमतेवर विश्वास ठेवणाऱ्या लोक आणि संघटनांच्या पाठिंब्यानेही घडला आहे. डेलॉइट इंडियाचे प्रोत्साहन हे केवळ एक हावभाव नाही, ते एक असे विधान आहे ज्यातुन कळते की, सर्व प्रकारच्या प्रतिभांना लक्षात घेतले पाहिजे, त्यांचे कौतुक केले पाहिजे आणि पाठिंबा दिला पाहिजे. मला आशा आहे की, माझी कथा इतरांना आव्हाने स्वीकारण्यास, त्यांच्या स्वप्नांना पूर्ण करण्यास आणि चिकाटीच्या शक्तीला कधीही कमी लेखू नये या विचाराला प्रेरित करेल.

शीतलसारख्या कथांचे कौतुक करून आणि त्यांना बळकटी देऊन, डेलॉइट इंडिया देशातील सर्वात मौल्यवान संसाधन म्हणजे देशाच्या नागरिकांमध्ये गुंतवणूक करत आहे. एकत्रितपणे, आपण एक असा पाया तयार करू शकतो जिथे प्रतिभेला वाव दिला जाईल, संधी उपलब्ध होतील, जेणेकरून जागतिक स्तरावर भारताचे स्थान अधिक मजबूत होईल.




## आयबीएमने नवीन इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर सुरू केले

**यवतमाळ, १८ ऑगस्ट :** आयबीएम (आयबीएम: एनवायएसई) ने मुंबईत आपले नवीन आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर उघडल्याची घोषणा केली. या केंद्राचा उद्देश भारतीय कंपन्यांना एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग यांचा वापर करून व्यवसाय सुधारण्यात मदत करणे हा आहे. यासाठी आयबीएमने महाराष्ट्र सरकार सोबत एक लेटर ऑफ इन्टेन्ट (एलओआय) साइन केले आहे, ज्याद्वारे राज्याच्या क्वांटम उपक्रमांना समर्थन देण्याच्या संधी शोधल्या जातील. एलओआय मध्ये अशा क्षेत्रांचा समावेश आहे जिथे आयबीएम राज्याला माहिती, कौशल्य आणि अनुभव देऊ शकते, जे राज्याला आपला क्वांटम उपक्रम तयार करण्यास मदत करतील, तसेच वर्कशॉप्स आणि कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे राज्याच्या क्वांटम इकोसिस्टमच्या विकासात योगदान देतील.

या सेंटरचे उद्घाटन करताना महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, एआय, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्सच्या मदतीने आम्ही विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारत निर्माण करत आहोत.हे तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वतता आणि कार्यक्षमता वाढवू शकते, वाढ आणि प्रगतीसाठी नवीन संधी निर्माण करू शकते.आयबीएमसोबतच्या आमच्या सहकार्याद्वारे, आम्ही क्वांटम इनोव्हेशनचा वापर जीवन परिवर्तनासाठी करू, त्याच वेळी त्याचे फायदे लोकशाहीकृत करण्यासाठी आणि राज्यातील प्रत्येक नागरिकासाठी ते उपलब्ध करून देण्यासाठी कुशल प्रतिभा समूह तयार करू.

हॅन्स डेकर्स, जनरल मॅनेजर, आयबीएम एशिया पॅसिफिक म्हणाले, आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर भारतातील एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग क्षेत्रातील प्रगतीस मदत करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकट करते. महाराष्ट्र सरकारला त्यांचा स्वतःचा सक्षम आणि प्रगत क्वांटम इकोसिस्टम तयार करण्यास मदत करण्याची आमची इच्छा हे आमच्या वचनबद्धतेचे उदाहरण आहे. संदीप पटेल, मॅनेजिंग डायरेक्टर, आयबीएम इंडिया आणि साऊथ एशिया म्हणाले, देशाच्या राष्ट्रीय क्वांटम मिशन आणि विकसित भारतच्या उद्दिष्टांनुसार, राज्यात क्वांटम कम्प्युटिंग कौशल्ये वाढवण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत काम करण्याची संधी मिळाल्याचा आयबीएमला आनंद आहे.

## सॅमसंग इंडियाने २०२५ चे साउंडबार लाइनअप लॉन्च



**गुरुग्राम, १८ ऑगस्ट :** भारताचा एक मोठा कंज्युमर इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड, सॅमसंग, ने आज आपला २०२५ साउंडबार लाइनअप लॉन्च केला आहे. या नवीन साउंडबारमध्ये ऑडिओ इंटेलिजन्स, अॅडॅप्टिव्ह डिझाइन आणि स्मार्ट होम इंटीग्रेशनसह आधुनिक सुविधा आहेत. आजच्या काळातील भारतीय घरांच्या आणि पाहण्याच्या सवयींनुसार तयार केलेली ही साउंडबार रेंज वेगवेगळ्या आकारात उत्कृष्ट कामगिरी आणि वैयक्तिक अनुभव देते. नव्या लाइनअपमध्ये फ्लॅगशिप एचडब्ल्यू-क्यू९९०एफ आणि कन्वर्टिबल एचडब्ल्यू-क्यूएस७००एफ मॉडेल्स आहेत. या नवीन रेंजमध्ये जगातील लेटेस्ट इनोव्हेशन दिले आहेत जे रोजच्या मनोरंजनाचा अनुभव खास बनवतात. यात एआय साउंड ऑप्टिमायझेशनने कंटेंटनुसार रिअल-टाइम ऑडियो ट्यूनिंग होते, डायनामिक बास कंट्रोलने गडद पण स्वच्छ लो-एंड साउंड मिळतो, एक्टिव्ह व्हॉइस ऍम्प्लिफायर प्रो संवाद स्पष्ट करतो आणि एकीकृत जायरो सेंसर प्लेसमेंटनुसार साऊंड अॅडजस्ट करतो. कॉम्पॅक्ट वायरलेस सबवूफर छोटे असूनही जोरदार बास देतो, क्यू-सिम्फनी प्रो सॅमसंग टीव्हीसोबत साऊंड सिंक्रोनाइज करतो, तर वायरलेस डॉल्बी अॅटमॉस केबलशिवाय सिनेमॅटिक ३डी ऑडियो अनुभव देते.

विप्लेश डांग, सीनियर डायरेक्टर आणि हेड-व्हिज्युअल डिस्प्ले, सॅमसंग इंडिया बिजनेस, यांनी सांगितले, सॅमसंगचे नवीन साउंडबार आमच्या प्रीमियम टीव्ही सिस्टमसोबत उत्तम काम करतात, आता हे विजन एआयसह येतात आणि रोज टीव्ही पाहण्याचा अनुभव खास बनवतात. ही रेंज उत्कृष्ट साउंड इंजिनिअरिंगचे उदाहरण आहे, जी स्लिक डिझाइनमध्ये जबरदस्त लवचीकता देते. एआयच्या मदतीने अॅडॅप्टिव्ह साउंड आणि आकर्षक डिझाइनसह, ही नवीन साउंडबार रेंज आधुनिक आणि सुंदर ऑडिओ सोल्यूशन शोधणाऱ्या लोकांच्या गरजा पूर्ण करते. तुम्ही फिल्मप्रेमी असाल, साधेपणा आवडत असेल किंवा स्मार्ट होम तयार करत असाल, सॅमसंगची ही नवीन रेंज तुमच्या घर, स्टाईल आणि गरजेनुसार एकदम परफेक्ट साउंडबार देते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सवाच्या लोगोचे अनावरण

**सोलापूर, १८ ऑगस्ट:** सोलापूर सोशल फाउंडेशनतर्फे २७ सप्टेंबर हा जागतिक पर्यटन दिन ते २ ऑक्टोबर या महात्मा गांधी जयंतीदरम्यान सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले असून या महत्वाकांक्षी महोत्सवाच्या लक्षवेधी लोगोचे अनावरण सोलापुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख आणि विविध क्षेत्रातील उपस्थित होते. आमदार आणि माजी वस्त्रोद्योगमंत्री सुभाष देशमुख यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा महोत्सव सोलापूरच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी करणार आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटनाचा सर्वांगीण विकास करणे आणि त्या माध्यमातून ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, निसर्ग व ग्रामीण पर्यटनाचा प्रचार व प्रसार करणे या उद्दिष्टाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाची संकल्पना ५-पी मार्केटिंग ब्रँडिंग या तत्वावर आधारित असून प्लेसेस, पर्सनॅलिटीज,प्रॉडक्ट्स, प्लेसमेंट, पोल्युशन-फ्री एन्व्हायर्नमेंट या पाच महत्वपूर्ण पीभोवती त्याची विण आखली गेली आहे. प्लेसेस म्हणजेच जिल्ह्यातील धार्मिक, सांस्कृतिक, औद्योगिक व ग्रामीण पर्यटन स्थळे; पर्सनॅलिटीज म्हणजे सोलापुरातील कलाकार, संशोधक, आधुनिक शेतकरी, उद्योजक; प्रॉडक्ट्स म्हणजे स्थानिक खाद्यसंस्कृती, कृषी उत्पादन व औद्योगिक निर्मिती ; चौथा पी म्हणजे प्लेसमेंटच्या माध्यमातून तरुणांसाठी जास्तीत जास्त रोजगारनिर्मिती आणि पोल्युशन-फ्री एन्व्हायर्नमेंटच्या माध्यमातून वृक्षलागवड व पर्यावरण संवर्धन! अशा या सर्वांगीण आणि सर्वसमावेशक अशा संकल्पनेतून हा विकास साकारणारण्याचे स्वप्न आहे.

या संकल्पनेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तोंड भरून कौतुक केले. सोमवारी ते सोलापूर शहराच्या दौर्यावर होते. त्यावेळी त्यांच्या हस्ते सोलापूर पर्यटन महोत्सवाच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, आ. समाधान आवताडे, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे व विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्र सरकारच्या क्वांटम उपक्रमांना मदत करण्याची योजना आयबीएमने जाहीर

**चंद्रपूर, १८ ऑगस्ट :** आयबीएम (आयबीएम: एनवायएसई) ने मुंबईत आपले नवीन आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर उघडल्याची घोषणा केली. या केंद्राचा उद्देश भारतीय कंपन्यांना एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग यांचा वापर करून व्यवसाय सुधारण्यात मदत करणे हा आहे. यासाठी आयबीएमने महाराष्ट्र सरकार सोबत एक लेटर ऑफ इन्टेन्ट (एलओआय) साइन केले आहे, ज्याद्वारे राज्याच्या क्वांटम उपक्रमांना समर्थन देण्याच्या संधी शोधल्या जातील. एलओआय मध्ये अशा क्षेत्रांचा समावेश आहे जिथे आयबीएम राज्याला माहिती, कौशल्य आणि अनुभव देऊ शकते, जे राज्याला आपला क्वांटम उपक्रम तयार करण्यास मदत करतील, तसेच वर्कशॉप्स आणि कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे राज्याच्या क्वांटम इकोसिस्टमच्या विकासात योगदान देतील. या सेंटरचे उद्घाटन करताना महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, एआय, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्सच्या मदतीने आम्ही विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारत निर्माण करत आहोत.हे तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वतता आणि कार्यक्षमता वाढवू शकते, वाढ आणि प्रगतीसाठी नवीन संधी निर्माण करू शकते.आयबीएमसोबतच्या आमच्या सहकार्याद्वारे, आम्ही क्वांटम इनोव्हेशनचा वापर जीवन परिवर्तनासाठी करू, त्याच वेळी त्याचे फायदे लोकशाहीकृत करण्यासाठी आणि राज्यातील प्रत्येक नागरिकासाठी ते उपलब्ध करून देण्यासाठी कुशल प्रतिभा समूह तयार करू.संदीप पटेल, मॅनेजिंग डायरेक्टर, आयबीएम इंडिया आणि साऊथ एशिया म्हणाले, देशाच्या राष्ट्रीय क्वांटम मिशन आणि विकसित भारतच्या उद्दिष्टांनुसार, राज्यात क्वांटम कम्प्युटिंग कौशल्ये वाढवण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत काम करण्याची संधी मिळाल्याचा आयबीएमला आनंद आहे.

## बिर्ला ओपस पेंट्सने दिले भारताचे पहिले-वहिले पेंट प्रॉमिस!



**नागपूर, १८ ऑगस्ट:** डेकोरेटिव्ह पेंट्स क्षेत्राला मिळालेल्या लक्षणीय गतीचा फायदा घेत आदित्य बिर्ला समूहाच्या ग्रासिम इंडस्ट्रीजचा एक भाग असलेल्या बिर्ला ओपस पेंट्सने आज बिर्ला ओपस अशुरन्स या आपल्या नव्या अभियानाची सुरुवात केल्याची घोषणा केली. भारतीय पेंट उद्योगात अशा प्रकारची हमी पहिल्यांदाच दिली जात आहे. या उपक्रमातून बिर्ला ओपस पेंट्सचा आपल्या प्रगत उत्पादनांच्या गुणवत्तेवरील प्रगाढ विश्वास दिसून येतो, तसेच ग्राहकांना असामान्य समाधान देण्याची त्यांची वचनबद्धता देखील अधोरेखित होते.

या जाहिरातीत या उत्पादनाचे ब्रँड अम्बॅसडर विकी कौशल आणि रश्मिका मंधाना आपल्या मोहक रूपात दिसतात. बिर्ला ओपस पेंट्स सोबत त्यांचा यशस्वी सहयोग अद्याप सुरू आहे. या टीव्हीसी मध्ये रणवीर शौरी, मुरली शर्मा, सीमा पाहवा आणि जावेद जाफरी हे कलाकार देखील वेगवेगळ्या जाहिरातीत दिसतात. या फिल्म्समध्ये विकी आणि रश्मिकाने वेगवेगळे लुक धारण करून या ब्रँडचे आश्वासन लोकांपर्यंत पोहोचवले आहे तसेच डिझाईन आणि बांधकाम क्षेत्राच्या समुदायाला बिर्ला ओपस पेंट उत्पादने वापरण्याची शिफारस केल्याबद्दल सर्जनशील व्यत्यय जाहिरात शैलीत धन्यवाद दिले आहेत. या अभियानाच्या माध्यमातून प्रगत उत्पादने असलेला एक खराखुरा विश्वासार्ह ब्रँड म्हणून स्वतःला स्थापित करण्याचा बिर्ला ओपस पेंट्सचा उद्देश आहे.

सदर अभियानाबद्दल टिप्पणी करताना बिर्ला ओपस पेंट्सचे सीईओ रक्षित हरगवे म्हणाले, आमच्या बिर्ला ओपस अशुरन्स अभियानातून आमच्या उत्पादनांची असामान्य गुणवत्ता आणि त्यांची कामगिरी यावरील आमचा प्रगाढ विश्वास प्रतिबिंबित होतो. आम्ही हे जाणतो की, घराला रंग देणे हा उपभोक्त्यांसाठी एक मोठा निर्णय असतो आणि बिर्ला ओपस अशुरन्स ही त्यांना संपूर्ण आश्वस्त करण्याची आमची एक रीत आहे. खऱ्या अर्थाने ग्राहक-केंद्री ब्रँड बनण्याची आमची वचनबद्धता यातून बळकट होते.

बिर्ला ओपस पेंट्सचे मार्केटिंग हेड इंद्रप्रीत सिंह म्हणाले, आमच्या संवाद प्रवासात पुढे जात असताना आम्ही बिर्ला ओपस अशुरन्सचे अनावरण करत आहोत, जे आमच्या उत्पादनांच्या गुणवत्तेवरील विश्वासाचे एक सशक्त विधान आहे. या फिल्म्समध्ये विनोद आणि आश्वासन यांच्यात अचूक समतोल साधला आहे. विकी आणि रश्मिका यात वेगवेगळ्या रूपात आणि परिस्थितीत प्रकटतात आणि आपली मोहिनी घालतात. बिर्ला ओपस अशुरन्सच्या माध्यमातून आम्ही आपल्या शब्दाला जगणारा ब्रँड घडवत आहोत.

## २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची : व्हीआयटी कुलगुरू डॉ. जी. विश्वनाथन



**वेल्लोर, १८ ऑगस्ट:** वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीआयटी) चे कुलगुरू डॉ. जी. विश्वनाथन म्हणाले की, २०४७पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी शिक्षणाचा विकास करणे खूप महत्वाचे आहे. ते आज व्हीआयटीच्या ४० व्या दीक्षांत समारंभात बोलत होते.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. महादेवन यांनी प्रमुख पाहुणे म्हणून समारंभाला उपस्थिती लावली आणि पदवीधरांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली. यावेळी ८,३१० पदवीधर विद्यार्थी, २,८०२ पदव्युत्तर विद्यार्थी आणि ४५१ विद्यार्थ्यांना डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. याशिवाय, २०३ विद्यार्थ्यांना त्यांच्या रँकिंगच्या आधारे सन्मानित करण्यात आले, तर ६८ उत्कृष्ट विद्यार्थ्यांना सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

दीक्षांत समारंभात व्हीआयटीचे उपाध्यक्ष शंकर विश्वनाथन, शेखर विश्वनाथन आणि जी.व्ही. सेल्वम, विश्वस्त रमणी बालसुंद्रम, कार्यकारी संचालक संध्या पेंट्रेडी, सहाय्यक उपाध्यक्ष कदंबरी एस. विश्वनाथन, कुलगुरू व्ही.एस. कांचना भास्करन, सहाय्यक कुलगुरू पार्थसारथी मलिक आणि कुलसचिव टी. जयभारती हे मान्यवर उपस्थित होते.

डॉ. विश्वनाथन म्हणाले की, भारतीय विद्यापीठे अजूनही जागतिक क्रमवारीत मागे आहेत. व्हीआयटी सध्या पहिल्या ५०० विद्यापीठांमध्ये आहे. त्यांनी जगातील पहिल्या १०० किंवा २०० संस्थांमध्ये ही संख्या वाढवावी असे आवाहन केले. त्यांनी व्हीआयटीच्या सामाजिक बांधिलकीचा उल्लेख करत म्हटले की, उत्तर आर्कोट प्रदेशातील १०,००० विद्यार्थ्यांना - आता ७५ लाख लोकसंख्या असलेल्या चार जिल्ह्यांमध्ये विभागले गेले आहे - शिष्यवृत्ती देण्यात आली आहे.

त्यांनी काळा पैसा, करचोरीचा आणि भ्रष्टाचाराला राष्ट्रीय आजार म्हटले. त्यांच्या मते, 'दरवर्षी देश करचोरीच्या कारणामुळे ८-९ लाख कोटी रुपये आणि भ्रष्टाचाराच्या कारणामुळे ६ लाख कोटी रुपये गमावतो. स्विस बँकांमध्ये जमा केलेला भारतीय काळा पैसा इतर सर्व देशांच्या एकूण ठेवींपेक्षा जास्त आहे. विद्यार्थी समुदायाने या वाईट गोष्टींविरुद्ध लढले पाहिजे.'

२०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी शिक्षण ही गुरुकिल्ली आहे यावर डॉ. विश्वनाथन यांनी भर दिला. भारताचे दरडोई उत्पन्न सध्या २,९०० आहे, तर जपानचे ३५,००० आहे. उच्च शिक्षण मजबूत करून ही तफावत भरून काढता येईल. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांना शिक्षणावर अधिक पैसे खर्च करावे लागतील, असे ते म्हणाले.


## आज का अंदाज

मंगळवार १९ ऑगस्ट २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ | २ | ४ | ७ | ८ |
| ३५५ | ११२ | २३० | १२४ | ५८९ | १५८ | २६९ | १७० |
| ४९० | २२० | ३५७ | २७८ | ६७९ | ३४७ | ४५८ | ३६९ |
| ५८० | ३३८ | १२२ | ४६७ | ४९९ | २५७ | १८८ | २७९ |
| ३० | ४० | ५८ | ७८ | २३ | ४३ | ७१ | ८१ |
| ३१ | ४१ | ५६ | ७६ | २९ | ४९ | ७६ | ८६ |
| ३२ | ४२ | ५९ | ७९ | २५ | ४५ | ७० | ८० |

**१९ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ८३ | ९३ |
| २४ | ५४ | ८६ | ९६ |
| २७ | ५७ | ८० | ९० |
| १५६ | ६९० | ३५० | २३४ |
| २०० | ७८० | ४४० | ४५० |
| ३९० | ५०० | ५६७ | ३६० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## इत्ती सी खुशी मालिकेचे शूटिंग करताना सुम्बुल तौकीर खानला आपली बहीण सानिया हिला आईच्या ममतेने सांभाळल्याची आठवण झाली



**मुंबई, १८ ऑगस्ट :** सोनी सबवर इत्ती सी खुशी ही मालिका १८ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता सुरू होत आहे, त्याआधीच अन्विता दिवेकर या मालिकेच्या नायिकेने प्रेक्षकांमध्ये कुतूहल जागे केले आहे. ही भूमिका गुणी अभिनेत्री सुम्बुल तौकीर खानने साकारली आहे. या मालिकेत जबाबदारीच्या भावनेने आपल्या कुटुंबासाठी संघर्ष करणाऱ्या अन्विता या एका करारी तरुणीची कहाणी सांगितली आहे.

या मालिकेसाठी एका दृश्याचे शूटिंग करत असताना कधी काळी आपल्या प्रत्यक्ष जीवनात अन्विताच्या भावना अनुभवल्याचे सुम्बुलला आठवले. सुम्बुल सिंगल पॅरेंटची मुलगी असल्याने आपली धाकटी बहीण सानिया हिच्यासाठी तिने आईचीच भूमिका बजावली आहे, सानियाला सतत मार्गदर्शन केले आहे. अलीकडे आपल्या लहान बहिणीला अन्विता गृहपाठात मदत करत असल्याचे दृश्य चित्रित करत असताना आपल्या सख्ख्या बहिणीशी असलेले असेच नाते तिला आठवले. ते दृश्य चित्रित करत असताना ती भूतकाळात जाऊन पोहोचली. तिला आठवले सानिया किती तिच्या मागे-मागे असायची, आणि सुम्बुलशिवाय तिचे पान हलायचे नाही. लहान मूल जसे प्रत्येक गोष्टीत आपल्या आईची स्वीकृती घेत असते, तसेच सानियाचे सुम्बुलशी वागणे होते.

## राशीभविष्य

**मेष :** आज सुख-सुविधांमध्ये अडथळे येतील. घरगुती जीवनात तुम्हाला तुमच्या जोडीदारापासून दूर जावे लागू शकते. वाटेत अचानक वाहन बिघाड झाल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. धार्मिक कार्यात रस वाढेल.

**वृषभ :** रोजीरोटी क्षेत्रात काम करणाजया लोकांना नोकरीत त्यांच्या सहकाजयांशी अधिक समन्वय निर्माण करावा लागेल. व्यवसाय क्षेत्रात काम करणाजया लोकांना व्यवसायात नफा मिळण्याचे संकेत मिळतील.

**मिथुन :** व्यवसाय क्षेत्रात काम करणाजया लोकांना त्यांच्या कार्य योजनेचा विस्तार करावा लागेल. नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्याने यश मिळेल. सोबतच प्रकृतीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**कर्क :** आज कामावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करा. तुमच्या मेहनतीमुळे तुम्हाला अपेक्षित परिणाम मिळतील. कामाच्या ठिकाणी तुमची कामगिरी वरिष्ठ अधिकाजयांची प्रशंसा मिळवून देईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**सिंह :** कामाच्या निमित्ताने प्रवास करण्याची संधी मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस खूप चांगला आहे. अभ्यासात यश मिळेल. कुटुंबासोबत वेळ घालवल्याने नात्यात प्रेम वाढेल.

**कन्या :** कामाच्या ठिकाणी नोकरांच्या वाईट वागण्यामुळे मनात असंतोष निर्माण होईल. आयात-निर्यात क्षेत्रात काम करणाजयांना फायदा होईल. सरकारी क्षेत्रात काम करणाजयांना संघर्ष करावा लागेल.

**तुळ :** नवीन व्यवसायात गुंतवणूक करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. आर्थिक बाबतीत तुम्हाला कोणाचा तरी सल्ला घेणे फायदेशीर ठरेल. योगा आणि ध्यान केल्यास तुमचा दिवस अधिक चांगला जाईल.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण सकारात्मक राहील. ज्यामुळे मानसिक शांतता मिळेल. आरोग्यासाठी, बाहेरचे खाणे टाळा आणि पौष्टिक आहार घ्या. अनावश्यक खर्च टाळणे महत्त्वाचे आहे.


**धनु :** व्यवसायात तुमची मेहनत प्रगतीचा घटक ठरेल. नोकरीत उच्च अधिकाजयांशी तुमची जवळीक वाढेल. तुमच्या प्रामाणिकपणाची आणि कार्यशैलीची समाजात प्रशंसा होईल. नवीन उर्जेचा संचार होईल.

**मकर :** आज नवीन कल्पनांवर काम करावे, ज्यामुळे तुमच्या प्रोजेक्टमध्ये यश मिळेल. तुमच्या लीडरशिपमुळे तुम्ही सहकाजयांना चांगले मार्गदर्शन करू शकाल. तुमच्या जोडीदारासोबतचे नाते अधिक घट्ट होईल.

**कुंभ :** आजचा दिवस नवीन संधी घेऊन येईल. तुम्हाला आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे तुमची आर्थिक स्थिती अधिक मजबूत होईल. नोकरी किंवा व्यवसायात तुम्हाला मोठे यश मिळू शकते.

**मीन :** कुटुंबासोबत वेळ घालवल्याने तुम्हाला आनंद मिळेल. आरोग्याच्या दृष्टीने, आज कोणताही मोठा त्रास होणार नाही, परंतु नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. आर्थिक बाबतीत दक्षता बाळगा

## शब्दकोडे क्रमांक २१९५



**आडवे शब्द :-**
१) भांडण वाढविण्याचे कृत्य
६) भावनाशून्य, निष्ठूर
९) सांभाळ, रक्षण
१०) गाडीचे छत
११) सहाय्य,
१२) तोंडी वचन किंवा करार
१५) ट, दिमाख
१६) गाण्याची कला
१८) रसवान
१९) सततचे नामस्मरण
२१) हादरा देणारी (बातमी)
२६) तृष्णा
२८) विश्रांती
२९) जनरल नॉलेज
३२) सोन्याची नाजूक सांखळी
३४) सत्ता
३६) बेकायदेशीर
३८) घट्ट
३९) कोर्ट
४१) देव
४३) उत्तराधिकारी
४५) फुलातील सुगंधी द्रव
४६) डोंगर, किल्ला
४७) गव्हाचे कणीदार पीठ
४८) लबाडीचा हेतू
४९) शिक्षक
५०) पावसाची झड
५१) वातकारक, फोपशा
५२) छाती
५४) नेत्र
५५) जबाबदारी
५६) आपला नसलेला, परकीय
५७) मामा
५९) छोटी बैलगाडी
६१) प्रजा
६३) ढीग
६५) प्रस्थान
६८) मृत्यू नसलेला
६९) ब्रह्मदेवाचे एक नाव
७१) चलनवलन
७३) फसणे
७४) मार्गक्रमण
७५) कलावंत

**उभे शब्द :-**
१) आत्तापर्यंत
२) गाणे
३) सर्वस्व
४) निकट,
५) सरोवर
६) सारख्या वजनाचे
७) विविध
८) नृत्यकलेचे दैवत
१३) चाक
१४) जेमतेम
१७) मलई
२०) वारा
२२) करार, भिस्त
२३) पाठ्यपुस्तकातील गीत
२४) पोलीस
२५) जंगली
२७) अत्यंत तीव्र व फार जुने वैर
३०) मृदा
३१) आळंदी-देहूचे संत
३३) केसांची बट
३५) एक द्विदल धान्य
३६) अवाजवी
३७) मनाने घेतलेली भीती
३९) अत्तराचा फाया ठेवण्याचे पात्र
४०) एक बिनावासाचे पांढरे फूल
४२) कणीदार (तूप)
४४) वणवा
४५) शेवट, नाश
४९) सन्माननीय, वेतन न घेता काम करणारा
५०) ताबडतोब, लागलीच
५१) घाव, प्रहार
५३) माफी मागणारा
५६) अब्रू, समाजातील वट
५८) एकतार वाद्य
६०) झकास
६२) जावळा
६४) सत्ता चालविणाऱ्यांचा समूह
६६) चणचण, उणीव
६७) मनाला टोचणार दुःख
६८) निराधार स्त्री
७०) अभिनेता
७१) कष्ट, त्रास
७२) खार

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# एसटीबस व दुचाकीची भीषण धडक

## युवक ठार, महामार्गावर हाहाकार...!

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :**
अकोल्याजवळील मूर्तिजापूर शहराजवळ सोमवारी दि. १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाला. भरधाव एसटी बस व दुचाकीची समोरासमोर धडक होऊन कोळंबी गावचा २५ वर्षीय तरुण आयुष गाडगे जागीच ठार झाला तर त्याचा साथीदार प्रथमेश भोयर (२४) गंभीर जखमी झाला. या अपघातामुळे महामार्गावर रक्ताचे थारोळे व तासभर वाहतूक ठप्प झाल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, बुलढाणा वरून नागपूरकडे जाणारी एसटी (क्र. एमएच २० जीसी २५९४) आणि मूर्तिजापूरहून कोळंबीकडे जाणारी दुचाकी (क्र. एमएच ३० एजे ८२३९) यांची व्यास हॉटेल जवळ जबर धडक झाली. धडकेचा आवाज एवढा भीषण होता की, दुचाकीचे तीन तुकडे झाले. अपघातानंतर प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.प्रत्यक्षदर्शींच्या मते, मृतक आयुष गाडगे हा राँग साईडने वाहन चालवत होता.




तसेच त्याने हेल्मेट न घातल्याने डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. नियमांचे पालन केले असते तर आयुषचा जीव वाचला असता, अशी खंत शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अजित जाधव यांनी व्यक्त केली.जखमी प्रथमेश भोयर याला तातडीने श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला अकोला जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

अपघातामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. वारंवार सूचना देऊनही हेल्मेटचा वापर व वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत बेपर्वा राहणाऱ्या चालकांमुळे अशा अपघातांची पुनरावृत्ती होत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# पातुर तालुक्यात अतिवृष्टीचा तांडव

## नद्या-नाल्याना महापुर, अनेक गावांचा संपर्क तुटला

**पातुर,दि १८ (प्रतिनिधी) :**
पातुर तालुक्यात काल रात्रीपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्याला पुराचा तडाखा बसला आहे. धरणे, नद्या व नाले हाउसफुल झाले असून अनेक गावांमध्ये पाणी शिरले आहे. झरंडी या गावाला सध्या पाण्याने वेढा दिला असून तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.सकाळी ११ वाजल्यापासून दुपारपर्यंत पातुर-बाळापूर हा प्रमुख रस्ता बंद राहिला. विवरा, चरणगाव, पातुर-वाडेगाव पुलांवरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असल्याने वाहतूक ठप्प झाली आहे.





**मोर्णा धरण ओव्हरफ्लो, गावांना धोका**

मोर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू असून सांडव्यावरून तब्बल ५३ से.मी. पाणी वाहत आहे. त्यामुळे धरणात येणारा संपूर्ण पाण्याचा येवा नदीपात्रात सोडला जात आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने विसर्ग केव्हाही वाढू शकतो.यामुळे आगीखेड, आस्टुल पास्टूल, कोठारी या गावांना पुराचा धोका निर्माण झाला असून पास्टूल गावाचा संपर्क तुटला आहे. दरवर्षी पावसाळ्यात पूल बंद होत असल्याने या गावाचे पुनर्वसन व्हावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन तायडे यांनी केली आहे.कोठारी बुजुर्ग व खुर्द परिसरातील शेतांमध्ये पाणी घुसल्याने शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली आली आहेत. याचबरोबर तालुक्यातील निर्गुणा धरण, मोर्णा धरण आणि पातुर तलाव हे शंभर टक्के भरले असून ओव्हरफ्लो सुरू आहेत.अतिवृष्टीमुळे निर्गुणा नदीने उग्ररूप धारण केले असून धोक्याची पातळी ओलांडली आहे. परिणामी चोंडी, अंधार, सांगवी या गावांचा संपर्क तुटला आहे. आलेगाव, चरणगाव या गावांना पुराचे पाणी लागले आहे.विवरा गावचा नदीवरील पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. दरम्यान चोंडी धरणाच्या सांडवा भिंतीवरून तब्बल सहा फूट पाणी वाहत आहे, त्यामुळे पूरस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तहसील प्रशासन सतत प्रयत्नशील आहे. मंडळ अधिकारी श्री डाबेराव, श्री महादेवराव नाईक, पटवारी किशोर खुरसडे आणि कोतवालांसह प्रशासनाचा ताफा प्रभावित भागांचा दौरा करून परिस्थितीचा आढावा घेत आहे. नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून कोणीही पाण्यात जाऊ नये असे आवाहन आपातुर तहसीलदार डॉ. राहुल वानखडे यांच्यावतीने करण्यात आले

# ढगफुटीने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

## सरकारविरोधात काळा पोळा आंदोलनाचा इशारा



**मुर्तिजापुर,दि १८ (प्रतिनिधी) :**
तालुक्यात १६ ऑगस्ट रोजी झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिसकावून घेतला आहे. ही अतिवृष्टी झाल्याचे समजताच क्रांतिकारी युवा शेतकरी संघटनेचे पदाधिकारी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर धडकले, नुकसानग्रस्त शेतीची प्रत्यक्ष पाहणी केली व तातडीने म दतीसाठी संबंधित अधिकाऱ्यांशी थेट चर्चा करून प्रशासनाला जागेवरच धारेवर धरले. शासनाने तातडीने पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, निवडणुकीतील सातबारा कोरा आश्वासनाची पूर्तता करावी, पीकविमा योजनेतील रद्द नियम पूर्ववत करून खरीप २०२४ मधील थकीत रक्कम वितरित करावी तसेच कापूस व तुरीला १० हजार तर सोयाबीन व हरभऱ्याला ८ हजार रुपये प्रति क्विंटल भाव द्यावा, या मागण्या संघटनेने स्पष्टपणे मांडल्या.या पार्श्वभूमीवर आज उपविभागीय अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री यांच्या नावे निवेदन देण्यात आले. जिल्हा संघटक राहुल वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या निवेदनावेळी जिल्हा उपाध्यक्ष सय्यद रियाज, तालुकाध्यक्ष शुभम जवंजाळ, प्रवीण पाटील खोत, रामदास भगत, संदीप पाटील वहिले, श्रीकुमार खोत, नितीन खेडकर, सोपान तराळ, संतोष रुद्रकार, मंगेश मानकर, गुलाबराव ठाकरे, धनंजय इंगोले, संतोष ठाकरे व शुभम ठाकरे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यात पुढील चार दिवस पाऊस हवामान केंद्राचा अंदाज



**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :**
जिल्ह्यात आजपासून दि. २१ ऑगस्टपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. पावसामुळे नदी, नाले व तळ्यांतील पाणीसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे पाण्यात शिरण्याचे अनावश्यक धाडस करू नये. अनावश्यकपणे पाण्यात जाण्याचे धाडस करू नये. नदीमध्ये वाहून जाणे किंवा बुडण्याची शक्यता आहे. पुर आलेल्या रस्त्यावरून गाडी चालविणे टाळावे. पाणीसाठ्याजवळ सेल्फी काढण्याचा मोह करू नये. वीज व पावसापासून बचावाकरिता सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्यात यावा. अशास्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये. नदीकाठाजवळील गावातील ग्राम स्थांना सतर्कतेची सुचना देण्यात आले आहे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठ व ज्युनिअर कॉलेजमध्ये कावड धारी भक्तांचे स्वागत

अकोट : लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठ व ज्युनिअर कॉलेजमध्ये श्रावण सोमवारची निमित्त साधून कावडधारी शिवभक्तांचे भव्य स्वागत व उसडीचे वाटप करण्यात आले याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष कुंजीलालजी कोठारी, प्राचार्य शामकुमार शर्मा, हे प्रमुख अतिथी म्हणून हजर होते सर्वप्रथम संस्थेचे कोषाध्यक्ष कुंजीलालजी कोठारी यांनी भगवान महादेवाच्या प्रतिमेचे पूजन व अभिषेक केला गजानन नगर कावड यात्रा व जय भवानी क्रीडा प्रसारक मंडळ रामटेक पुरा अकोट या कावड यात्रा व श्रीराम व्यायाम शाळा मोठे बारगन ह्या कावड चे स्वागत अभिषेक व पूजन करण्यात आले याप्रसंगी याप्रसंगी ह.भ.प पुरुषोत्तम महाराज नेमाडे हे प्रामुख्याने हजर होते व त्यांनी वरील प्रमुख कावड यात्रेची पूजन केले प्राचार्य शामकुमार शर्मा यांनी सुद्धा सर्व कावड यात्राचे पूजन व स्वागत केले कार्यक्रमाचे नियोजन व तयारी हरी ओम भगत,रवी टिकार आकाश गोरले, अमोल फुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली याप्रसंगी सर्व शिक्षक विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी व शिवभक्त मोठ्या संख्येने हजर होते पाऊस पडत असतानाही शिवभक्तांचा व सर्व शिक्षकांचा उत्साह हा पाहण्यालायक होता शाळेची ही परंपरा यावर्षी ही जपण्यात आली व पुढील अशी सुरू राहणार आहे.



जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी खाजगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने २० ऑगस्ट रोजी 'प्लेसमेंट ड्राईव्ह' होणार आहे.

# नसदाशिवावरील पोळ्याचा बाजारात तुफान गर्दीत भरला



**हिवरखेड** : पंचक्रोशीत प्रसिद्द असलेल्या श्रावन मासातला शेवटचा सोमवारी भरनारा बाजार हा पुरातन श्री सदाशिव सस्थांन वर भरत असतो बळीराजा व वृषभराजा चा येनारा महत्वाचा सन म्हनजे पोळा होय पोळ्यात बैल सजावट चे सामान रगींबेरगी दोर मथाट्या झुला काशाच्या कंसाट्या गळ्यातील घुंगराचे चाळ, शिंगाला लावायचा रंग विषेश मानाचा म्हनून ऐका विशेष झाडाच्या सालीचा पापुद्रा त्याला शेतकरी वाक म्हनतात शिंगाला बांधायचे गोंडे पोथीपान तसेच तान्हा पोळ्यातील शाडुमातीचे पुजनाचे आकर्षक बैल नंदीबैल सर्व देवता पोळापुजनाचे पीठोरी पठ लाल करदोडे रग घेऊन बसलेले अतारी हे सर्व शेवटचा सोमवार म्हनून हिवरखेडच्या बाजारात येनारे वारी पींपरखेड मोहपानी ऊंबरशेवडी झरीबाजार चंदनपुर बोरव्हा तलाई देड तलाई चीतलवाडी,खडाळा वारखेड सौंदळा तळेगाव गोर्धा हिगंणी कार्ला मालठाना या गावातील शेतर्कयानी रीमझीम बरसर्नाया श्रावनसरीत आपल्या बैल जोडी सामान खरेदी साठी या बस स्टॅड ते सदाशिव सस्थान पर्यंत भरलेल्या या बाजारात गर्दी केली होती.

# मुर्तिजापुर येथे माँ चंडिका कावडधारी व महिला शिवभक्त ठरले आकर्षण









**मुर्तीजापूर :** श्रावणातील चौथ्या सोमवारी मुर्तीजापूर शहरात शिवभक्तीचा महासागर उसळला. शेकडो वर्षांची परंपरा असलेला कावड उत्सव यंदा विक्रमी गर्दीत पार पडला. लाखपुरी येथून आणलेले पूर्णा नदीचे पवित्र जल घेऊन हजारो शिवभक्तांनी १५ किमी पदयात्रा करत 'बम बम भोले' च्या गजरात शहरात प्रवेश केला.शहरातील मुख्य मार्गांवर भाविकांचे स्वागत करण्यासाठी मंडप, पाणी व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. महिला, पुरुष, तरुण, वृद्ध अशा सर्वच वयोगटातील शिवभक्तांचा उत्साह पाहून वातावरण भारावले. यंदाच्या यात्रेचे विशेष आकर्षण ठरले माॅ चंडिका कावडधारी शिवभक्तांचा देखावा. विशेष म्हणजे महिला शिवभक्तांचा सहभागही कौतुकाचा विषय ठरला.आमदार हरीश पिंपळे यांनी स्वतः हजेरी लावून माॅ चंडिका कावड घेऊन येणाऱ्या शिवभक्तांचे स्वागत केले. यावेळी भाविकांच्या चेहऱ्यावर उमटलेला उत्साह अधिकच द्विगुणित झाला. दरम्यान, यात्रेच्या सुरक्षेसाठी ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीधर गुठ्ठे व शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी जागोजागी चौक्या उभारून चोख बंदोबस्त ठेवला होता.


**महाराष्ट्र शासन**
**अकोला वनविभाग अकोला**

**वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे) बार्शिटाकळी मु.धाबा**
**ईमेल** – rfobarshitakiii.@gmail.com

महाराष्ट्र शासन, विद्युत विभागाकडील उचित वर्गवारीत नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन नमुन्यातील खालील कामाकरिता निविदा मागवि आहेत. सविस्तर निविदा सुचना परिक्षेत्र कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याच्या अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे) बार्शिटाकळी मु.धाबा यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे) बाशिटाकळी मुधाबा कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल,खालील कामा विषयी या कार्यालयाचे जा. क्र. / वप अ/निवीदा २१/४१८/२०२५-२६/ मु.धाबा / दि. १८/०८/२०२५

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | काम पुर्ण करण्याच्या कालावधी | निविदा संचाची किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | वनरक्षक टाईप १ निवास स्थान लोहगड बीट मौजे लोहगड अंतर्गत विद्युतीकरण करणे. | ९७७३५ | १ महिने | ५००/- |
| २ | वनरक्षक टाईप १ निवास स्थान महान बीट मौजे महान अंतर्गत विद्युतीकरण करणे. | ९७७३५ | १ महिने | ५००/- |
| ३ | वनरक्षक टाईप १ निवास स्थान परंडा बीट मौजे दगडपारवा अंतर्गत विद्युतीकरण करणे. | ९७७३५ | १ महिने | ५००/- |
| | एकुण | २९३२०५ | | |

**निविदा अटी व शर्ती :-**
१) कोरे निविदा प्रपत्राची मागणी करतांना कार्यालयीन पावती व्दारे निवीदा संचाची किंमत स्वीकारली जाईल. तसेच इसार रक्कम धनादेशा व्दारे वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) बार्शिटाकळी यांच्या नावे जमा करावे लागेल. तसेच विद्युत विभाग अकोला यांचे वैद्य पंजीबद्ध प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रमाणित केलेली सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदा प्रपत्रे देण्यात येणार नाही.
२) कोरी निविदा संच वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) बार्शिटाकळी यांच्या कार्यालयात दिनांक १९/०८/२०२५ वेळ सकाळी ११.०० वा पासुन ते २७/०८/२०२५ वेळ १८.०० वाजेपर्यंत कामकाजाच्या दिवशी मिळेल.
३) निविदा या कार्यालयात दिनांक २८/०८/२०२५ वेळ ११.०० वा. उघडण्यात येईल काही अपरीहार्य कारणास्तव दिनांक व वेळ मध्ये बदल होऊ शकतो.
४) निवेदेतील कामे रद्द करण्याचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) बार्शिटाकळी मु. धाबा यांना राहतील कामांचा कार्यरंभ आदेश हा निधी उपलब्धतेवर अवलंबून राहील.
५) निवेदा घेवून स्वत:ह कत्राटदाराने उपस्थित राहावे प्रतिनिधी पाठवु नये.
६) इतर अटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील.

**आर.आर. बोरकर**
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे)
बार्शिटाकळी मु.धाबा

जा,क्र,/जिमाका /अकोला/जाहिरात/४४ / २०२५


RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# कॅलिडोस्कोप



## ...आणि इंटरनेटचं व्यसन सुटलं

सध्याच्या इंटरनेटच्या जगात लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकालाच स्मार्टफोनचं व्यसन लागलं आहे. बरीच मुलं स्मार्टफोन हातात घेऊन तासनतास गेम खेळत बसतात. सोशल मीडियावर पडिक असतात. ही मुलं मैदानी खेळ खेळत नाहीत, वाचत नाहीत, अभ्यासातही मागे पडतात. मग अशा मुलांना या व्यसनातून बाहेर काढण्यासाठी पालक निरनिराळ्या कल्पना लढवतात. कॅनडामधल्या कॅलगरीमध्ये राहणाऱ्या जेमी क्लार्क यांनीही आपल्या मुलाचं स्मार्टफोनचं व्यसन सोडवण्यासाठी अजब युक्ती लढवली. त्यांचा १८ वर्षांचा मुलगा खोबे सतत फोनमध्ये डोकं खुपसून बसायचा. मग जेमी यांनी त्याला मंगोलियातल्या दुर्गम परिसरात नेलं. तिथे इंटरनेटच काय, वाहतुकीचीही सोय नव्हती. मंगोलिया कॅनडापासून आठ हजार किलोमीटर लांब आहे. जेमी यांनी मुलासोबत २२०० किलोमीटर अंतर कापलं. या काळात जेमी खोबेला वेगवेगळ्या ठिकाणी घेऊन गेले. त्यांनी बाईकवरून प्रवास केला, घोड्यावरून फिरले. डोंगराळ भागात तंबूमध्ये राहिले. खोबेला हे वातावरण खूप आवडलं. या प्रवासादरम्यान त्याला मोबाईल वापरता आला नाही. यामुळे खोबेचं मोबाईलचं व्यसन कमी झालं. इंटरनेट वापरलं नाही तर त्याची खूप चिडचिड होत असे. पण या प्रवासामुळे त्याची ही सवय सुटली. आता तो आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवतो. भरपूर गप्पा मारतो, वाचन करतो. हे जग इंटरनेटपेक्षाही खूप सुंदर आहे याची जाणीव खोबेला झाली.

## वाहतुकीचे नियम सांगण्यासाठी गाण्यांचा आधार

शहरांमध्ये वाहतूक व्यवस्था सांभाळणारे अनेक वाहतूक पोलिस लोकांना नियम मोडले, तर सौम्यपणे समजावून सांगतात, तर काही जण कडकपणे वागतात; परंतु एका वाहतूक पोलिसाची शैली वेगळी आहे. गर्दीच्या चौकात गाणे गाऊन हा पोलिस लोकांना वाहतुकीचे नियम समजावून सांगत आहे.

हेल्मेट, सीट बेल्ट आणि वाहतूक नियमांबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी तो एक गाणे गातो आहे. त्याचा आवाज, शैली आणि संदेश देण्याची पद्धत इतकी प्रभावी आहे, की लोक तिथेच थांबून त्याचे ऐकतात. या पोलिसाच्या शैलीचे अनेक लोक कौतुक करत आहेत. रस्त्यांवर चालण्यासाठी वाहतुकीचे नियम बनवले गेले आहेत. वाहतूक पोलिसांचे कर्मचारी त्यांना त्यांचे पालन करायला लावण्यासाठी तैनात असतात. कधीकधी हे वाहतूक पोलिस कर्मचारी लोकांना बोलून समजावून सांगतात, तर कधीकधी त्यांना चालान देऊन धडा शिकवतात; पण आजकाल एका वाहतूक पोलिसाचे



गाण्यात समजावून सांगणे समाज माध्यमावर चांगलेच व्हायरल झाले आहे. वाहतूक पोलिस गाणे गाऊन लोकांना वाहतूक नियम सांगत आहे. त्यात गाण्याचे सूर 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे', 'मेहंदी लगा के रखना' या प्रसिद्ध गाण्यावरून घेतले आहेत. पोलिस कर्मचारी 'फोटो तुम्हारी लेंगे', चलन कटा देंगे असे गाताना दिसत आहे. त्यावर अनेक लोक प्रतिक्रियाही देत आहेत.



## इथल्या महिला आहेत चिरतरूण


वय वाढल्याच्या खुणा चेहऱ्यावर दिसू लागतात. तारुण्य सरल्यानंतर चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. म्हणूनच महिला आणि पुरुष तरुण दिसण्यासाठी खूप प्रयत्न करतात. महिला ब्युटी पार्लरमध्ये जातात. कॉस्मेटिक सर्जरी करून घेतली जाते. पुरुषही वेगवेगळे उपचार करून घेतात. मात्र तैवानमधल्या महिलांचं सौंदर्य टिकून राहतं. या महिला चिरतरुण दिसतात. इथल्या महिलांचं वय वाढलं तरी त्या तरुणच दिसतात. तैवान हे एक बेट आहे. तैवान हा चीनचा एक भाग आहे. एक देश म्हणून तैवानचे जगातल्या १७ देशांशी संबंध आहेत. इथल्या महिला खूप सुंदर असतात आणि बराच काळपर्यंत तरुण दिसतात. मात्र या सौंदर्याचं रहस्य त्यांचा आहार किंवा मेक अप नाही तर वेगळ्याच कारणामुळे त्या चिरतरुण राहतात. तैवानमधल्या महिला आपल्या रुपाला खूप जपतात. त्यामुळे या महिला उन्हात बाहेर पडत नाहीत. उन्हात बाहेर पडल्यामुळे आपण काळे होऊ अशी भीती त्यांना वाटते. इथल्या महिला पावसातही भिजत नाहीत. तैवानमधल्या लोकांना खेळायला आवडतं. त्यामुळे ते तंदुरुस्तही असतात. याच कारणामुळे इथल्या महिला चिरतरुण दिसतात.




## इवलेसे देश

आपला देश आकाराने खूप मोठा आहे. या जगात १९५ देश आहेत. काही देशांचा आकार खूप मोठा आहे तर काही देश आकाराने खूपच लहान आहेत. या देशांची नावंही आपल्याला माहीत नसतील. अशाच काही देशांची ओळख कुतुहलजनक आहे.

भूमध्य समुद्रात माल्टा नावाचा देश आहे. हा देश सात बेटांचा समूह आहे. या देशाचं क्षेत्रफळ फक्त ३१६ चौरस किलोमीटर आहे. या देशाची लोकसंख्या फक्त साडेचार लाख इतकी आहे. १९६४ मध्ये माल्टा स्वतंत्र झाला. या देशावर बऱ्याच राष्ट्रांनी राज्य केलं. हिंदी महासागरातला मालदीवही जगातल्या काही छोट्या देशांपैकी एक आहे. लोकसंख्या आणि क्षेत्रफळाचा विचार केला तर मालदीव हा आशिया खंडातला सर्वात लहान देश आहे. २९८ चौरस किलोमीटर परिसरात पसरलेल्या या देशाची लोकसंख्या साडेचार लाखांच्या आसपास आहे. मालदीवला १९६६ मध्ये स्वातंत्र्य मिळालं. इथे पर्यटक मोठ्या संख्येने येतात. कॅरेबियन समुद्रात सेंट किट्स आणि नेविस हे दोन देश आहेत. ही दोन सुंदर अशी बेटं आहेत. त्यांचा शोध ख्रिस्तोफर कोलंबसने लावला होता. सेंट किट्स १६८ चौरस किलोमीटर तर नेविस ९३ किलोमीटर परिसरात पसरला आहे. पॅसिफिक महासागरात मार्शल हा बेटांचा समूह आहे. हा सुद्धा एक देश आहे. इथे १०० पेक्षा अधिक बेटं आहेत. या देशाचं संविधान आणि झेंडाही आहे. अमेरिकन डॉलर हे इथलं चलन आहे.




## स्मशानभूमीमध्ये क्यूआर कोड

स्मशानभूमीचे नाव ऐकताच बहुतेक लोकांच्या मनात शांतता आणि भूतकाळातील आठवणी येतात. पण कल्पना करा, की कबरीवरचा एक छोटासा क्यूआर कोड तुमच्या डोळ्यासमोर एखाद्याच्या संपूर्ण आयुष्याची कहाणी उलगडतो का? केरळमधील एका स्मशानभूमीत असेच काहीसे घडले आहे.

एका स्मशानभूमीतील कबरींना क्यूआर कोड जोडलेले आहेत, जे कोणीही स्कॅन करून मृताची संपूर्ण माहिती जाणून घेऊ शकते. क्यूआर कोड स्कॅन होताच मृताची माहिती मिळते. क्यू आर कोड स्कॅन करताच फोनमध्ये एक वेबसाइट उघडते. या वेबसाइटमध्ये त्या कबरीत पुरलेल्या व्यक्तीची संपूर्ण माहिती आहे. फक्त नाव किंवा वयच नाही, तर त्याची संपूर्ण जीवनकथा. त्याने कोणते काम केले, त्याच्या कुटुंबातील सदस्य कोण आहेत, त्याचे जुने फोटो आणि त्याच्या आठवणी आणि जीवनातील खास क्षण हे सर्व एकाच ठिकाणी दिसतात. त्या वेबसाइटवर 'आठवणी', 'कुटुंब', 'जीवनकथा' आणि 'टाइमलाइन' असे अनेक टॅब आहेत. त्यातून लोक त्या व्यक्तीबद्दल अधिक सखोल जाणून घेऊ शकतात.

सर्वात अनोखी गोष्ट म्हणजे अभ्यागत लॉग, म्हणजेच जे कोणी कबरीजवळ येतात, ते तेथे त्यांचे नाव लिहू शकतात, जेणेकरून श्रद्धांजली वाहण्यासाठी कोण आले हे कळू शकते. तिथे एक ओळ आहे जी प्रत्येकाच्या हृदयाला स्पर्श करते, 'ही फक्त एक कबर नाही. ही एक जिवंत कहाणी आहे.' आता लोक 'सोशल मीडिया'वर वेगवेगळी मते देत आहेत. काही जण याला एक उत्तम कल्पना म्हणत आहेत. त्यामुळे प्रियजनांच्या आठवणी नेहमीच जिवंत राहतील, तर काही लोक म्हणत आहेत, की स्मशानभूमीच्या शांततेत तंत्रज्ञानाचा हा खूप हस्तक्षेप आहे.

'सोशल मीडिया' वापरकर्ते वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले... ही एक अतिशय छान प्रणाली आहे, तुम्ही तुमच्या प्रियजनांच्या आठवणी पुन्हा जिवंत करू शकता. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले... या माहितीचा गैरवापरदेखील होऊ शकतो, तर अन्य एका वापरकर्त्याने लिहिले... हे खूप आश्चर्यकारक आहे, एक अतिशय सोपा आणि उत्तम मार्ग आहे.

## अबब... केवढं मोठं हे फुल!

उमललेलं फूल खूप सुंदर दिसतं. शास्त्रज्ञांना जगातलं सर्वात मोठ्या आकाराचं उमललेलं फूल सापडलं आहे. इंडोनेशियातल्या पश्चिम मध्य सुमात्रा बेटांवरच्या जंगलांमध्ये हे फूल सापडलं आहे. हे फूल खूपच अनोखं आणि सुंदर आहे. हे महाकाय फूल बघून शास्त्रज्ञही चाट पडले. हे फूल चार चौरस फूट परिसरात पसरलं आहे. या फुलाला रेफलिसिया



म्हटलं जातं. २०१७ मध्ये याच जंगलात तीन फूट लांबीचं आणि बारा किलो वजनाचं याच जातीचं फूल सापडलं होतं. ते त्यावेळचं सर्वात मोठं उमललेलं फूल होतं. मात्र आता या फुलाचा विक्रम मोडीत निघाला आहे. रेफलिसिया हे परजीवी फूल असून यातून सुगंध नाही तर दुर्गंध येतो. या फुलाची रचना सूर्यफुलासारखी असते. मात्र त्याचा रंग केशरी, आकाशी किंवा पांढरा असतो. हे फूल वर्षातले काही महिने उमलतं. ऑक्टोबरमध्ये हे फूल उमलू लागतं आणि मार्चपर्यंत पूर्णपणे उमलतं. काही काळानंतर हे फूल मरून जातं.



## विमानतळाच्या रन वे वरून धावते ट्रेन!

जगात अनेक विमानतळ आहेत; परंतु न्यूझीलंडचे गिस्बॉर्न विमानतळ पूर्णपणे वेगळे आणि मनोरंजक आहे. येथे उडणाऱ्या विमानाबरोबरच त्याच ठिकाणाहून जाणारी ट्रेन दिसते. एक रेल्वे लाईन ज्या मार्गावरून जाते, त्याच मार्गावरून विमाने उड्डाण करतात आणि उतरतात.

हे विमानतळ इतके खास आहे, की जर एखादी ट्रेन येत असेल तर विमानाला थांबावे लागते आणि जर विमान उड्डाण करणार असेल तर ट्रेन थांबवली जाते. येथे दोघांनाही एकमेकांना रस्ता द्यावा लागतो. गिसबॉर्न विमानतळ सुमारे १६० हेक्टरमध्ये पसरलेले आहे आणि त्यातून एक रेल्वे लाईन जाते, जी विमानतळाला दोन भागात विभागते. या रेल्वेला गिस्बॉर्न सिटी व्हिंटेज रेल्वे म्हणतात. ही ट्रेन वाफेवर चालते आणि वर्षातून सुमारे १५ वेळा धावपट्टीवरून जाते, विशेषतः उन्हाळ्याच्या हंगामात जेव्हा जास्त लोक येथे भेट देण्यासाठी येतात. या विमानतळावर काम करणारे लोक एकाच वेळी ट्रेन आणि विमान दोन्हीचा वेळ व्यवस्थापित करतात. कोण कधी येईल आणि कोणाला आधी रस्ता द्यायचा याची त्यांना पूर्ण काळजी घ्यावी लागते.

हे विमानतळ लहान दिसू शकते; परंतु दरवर्षी तिथून दीड लाखांहून अधिक लोक प्रवास करतात आणि येथून दर आठवड्याला सुमारे ६० देशांतर्गत उड्डाणे होतात. याशिवाय, येथे एक मुख्य धावपट्टी आणि तीन लहान धावपट्ट्या आहेत. त्यामुळे ते अधिक खास बनते. गिसबोर्न विमानतळ हे असे ठिकाण आहे, जिथे अभियांत्रिकी, शहाणपण आणि वेळेचे योग्य नियोजन एकत्रितपणे काहीतरी खूप वेगळे निर्माण करते. येथे जाताना असे वाटते, की एखाद्या चित्रपटातील एक दृश्य समोर आले आहे, जिथे विमाने उडत आहेत आणि त्याच वेळी ट्रेन ट्रॅकवर धावत आहे.

## कर्जफेड न केल्याने कर्जदाराची बायको जप्त!

कर्ज घेताना तारण म्हणून बँकेकडे काही वस्तू तारण ठेवावी लागते. कर्जाची परतफेड करू शकले नाहीत, तर बँक तारण म्हणून ठेवलेली गोष्टच जप्त करते, मग ते घर असू शकते किंवा सोने अथवा कार, दुचाकी वगैरे वगैरे; पण बँकवाल्यांनी एखाद्या जिवंत व्यक्तीवर, तेही एखाद्या महिलेवरच जप्ती आणून तिला सोबत नेल्याचा विचित्र प्रकार झाशीमध्ये घडला असून, बँक अधिकाऱ्यांच्या या गुंडगिरीविरोधात संताप व्यक्त करण्यात आला.

उत्तर प्रदेशातील झाशीमध्ये खासगी बँकेने कर्जाची रक्कम वसूल करण्यासाठी सर्व मर्यादा ओलांडल्या. कर्जाचा हप्ता न भरल्यामुळे, एका खासगी मायक्रो फायनान्स बँकेने एका महिलेला पाच तास ओलीस ठेवले. हप्ता दे आणि बायकोला ने, असे तिच्या पतीला सांगण्यात आले. हे प्रकरण बमहरौली गावातील आझाद नगर परिसरातील एका खासगी गट कर्ज देणाऱ्या बँकेशी संबंधित आहे. पूंछ येथील बाबाई रोड येथील रहिवासी रवींद्र वर्मा यांच्या पत्नी पूजा वर्मा यांना जबरदस्तीने बँकेत बसवण्यात आलं,असा आरोप आहे. पैसे द्या, तरच तुम्हाला तुमची पत्नी मिळेल असे उत्तर त्या महिलेच्या पतीला देण्यात आले. ते ऐकून तो हबकला.

रवींद्रने तिथे खूप विनवणी केली; पण बँक कर्मचाऱ्यांनी जराही दया दाखवली नाही. शेवटी, हताश होऊन रवींद्रने १११ नंबरवर फोन केला. पोलिस येताच बँक कर्मचाऱ्यांचे



चेहरे पडले आणि महिलेला घाईघाईने बाहेर काढण्यात आले. आरोपपीडित पूजा वर्मा हिने दिलेल्या अर्जात असे सांगितले, की तिने ४० हजार रुपयांचे कर्ज घेतले आहे. तिने आतापर्यंत ११ हप्ते भरले आहेत; परंतु बँकेच्या नोंदींमध्ये फक्त ८ हप्तेच दिसत आहेत. बँक एजंट कौशल आणि धर्मेंद्र यांनी तिचे तीन हप्ते हडप केल्याचा आरोप आहे.

मध्य प्रदेशातील टिकमगढ येथील रहिवासी असलेले बँक 'सीओ' संजय यादव तिच्या घरी पोहोचले आणि धमकी देऊन पैशाची मागणी करू लागले,असा आरोप महिलेने केला; मात्र त्या महिलेने नकार दिल्यावर पती-पत्नीला जबरदस्तीने बँकेत आणण्यात आले आणि तिथेच अनेक तास बसवून ठेवण्यात आले, असेही महिलेचे म्हणणे आहे. कानपूर देहात येथील रहिवासी बँक व्यवस्थापक अनुज कुमार यांनी सांगितले, की ती महिला गेल्या ७ महिन्यांपासून हप्ता भरत नव्हती, म्हणून तिला बोलावण्यात आले. एवढेच नव्हे तर ती महिला स्वतःच्या मर्जीने बँकेत बसली होती, असा दावाही त्यांनी केला.

सध्या पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. बँक कर्मचारी, एजंट आणि पीडित व्यक्तीची चौकशी सुरू आहे. कर्ज वसुलीच्या नावाखाली लोकांना ओलीस ठेवण्यासारखे डावपेच आता सामान्य झाले आहेत का? या घटनेने केवळ बँकेच्या कामकाजावरच नव्हे तर कायदा आणि सुव्यवस्थेवरही मोठा प्रश्न उपस्थित केला आहे.

## सडपातळ दिसण्याच्या नादात केले नको ते!

प्रत्येकालाच आपल्या वाढदिवसाला सर्वात सुंदर दिसायचे असते. नवीन कपडे घालून इतरांपेक्षा वेगळे दिसावे, असा प्रयत्न असतो; पण जेव्हा ही इच्छा जास्त होते, तेव्हा ती धोकादायक बनू शकते.

चीनमधील एका १६ वर्षीय मुलीने तिच्या वाढदिवसाला सडपातळ दिसण्यासाठी अशी चूक केली की तिचा जीव धोक्यात आला. वजन कमी करण्यासाठी तिने दोन आठवडे फक्त उकडलेल्या भाज्या खाल्लूया आणि रेचक औषधे घेऊ लागली. परिणामी तिला रुग्णालयात दाखल करावे लागले आणि तिचा जीव वाचवणे कठीण झाले. चीनमधील मेई नावाची १६ वर्षीय मुलगी खूप आनंदी होती. कारण तिचा वाढदिवस जवळ आला होता. त्या दिवशी तिने नवीन ड्रेस घातल्यावर सर्वांनी तिचे कौतुक करावे, अशी तिची इच्छा होती. तिथपर्यंत ठीक होते; पण मेईला वाटले, की ती थोडी जाड आहे. त्याबाबत विचार करून ती कमी खाऊ लागली. तिने दररोज फक्त थोड्या उकडलेल्या भाज्या खाल्लूया आणि पोट साफ करणारी औषधेदेखील घेतली.

असे करत करत दोन आठवडे गेले. मग अचानक एके दिवशी मेईचे हातपाय थरथर कापू लागले. तिला खूप अशक्त वाटू लागले आणि श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. तिचे कुटुंब घाबरले आणि तिला तातडीने रुग्णालयात घेऊन गेले. डॉक्टरांनी रुग्णालयात तिचे रक्त तपासले, तेव्हा असे आढळून आले, की तिच्या शरीरात पोटॅशियम खूप कमी झाले आहे. पोटॅशियम हे एक खनिज आहे, जे आपले हृदय आणि स्नायू योग्यरित्या कार्य करण्यास मदत करते. जेव्हा ते खूप कमी होते तेव्हा हृदयाचे ठोके थांबू



शकतात किंवा एखाद्या व्यक्तीचा श्वास थांबू शकतो.

डॉक्टरांनी ताबडतोब मेईला आपत्कालीन वॉर्डमध्ये दाखल केले आणि तिच्यावर १२ तास सतत उपचार केले. डॉक्टरांनी सांगितले, की मेईची प्रकृती इतकी बिकट झाली आहे, की तिला कधीही हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. जर थोडा जास्त उशीर झाला असता तर तिचा जीवही जाऊ शकला असता.


# अतिवृष्टीने ८१ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान


■ **महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १८ :**
जिल्ह्यात शुक्रवारपासून कोसळलेल्या पावसाने पाच तालुक्यांत प्रचंड थैमान घातले. उमरखेड, महागाव, पुसद, आर्णी या तालुक्यात पावसामुळे हाहाकार उडाला. पैनगंगा नदीला आलेल्या पुराने विदर्भ, मराठवाडा सिमेवरील अनेक गावांमध्ये नुकसान केले. जिल्ह्यात २८ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असून, २४ तासांत ४३.२० मिमी पावसाची नोंद झाली. या पावसामुळे खरीपाच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले. तब्बल ८१ हजार १२४ हेक्टरवरील पिके खरडून गेली तर तीन हजार ३६५ घरांची पडझड झाली. उमरखेड आणि पुसद तालुक्यात या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले.

गेल्या आठवड्यात जिल्ह्यात सर्वदूर पाऊस कोसळला. बुधवारी केवळ नऊ तासांत ७२ मिमी पावसाची नोंद झाली होती. त्यानंतर शुक्रवारी संध्याकाळपासून पावसाने वादळासह जोर पकडला. उमरखेड आणि पुसद तालुक्यात सर्वाधिक पाऊस कोसळला. महागाव आणि बाभूळगाव तालुक्यात दोघे जण पुरात वाहून गेले, तर घाटंजी तालुक्यात वीज कोसळल्याने एका शेतमजुराचा मृत्यू झाला.

वीज कोसळल्याने दोन गायी, एक बैल, एक म्हैस ठार झाले, तर १४ जनावरे विविध ठिकाणी पुरात वाहून गेले. उमरखेड तालुक्यात तीन हजार ४९ घरांचे तर पुसद तालुक्यात २५९ घरांची पडझड झाली. उमरखेड तालुक्यात २०० पेक्षा अधिक घरांमध्ये पुराचे पाणी शिरले होते.

गेल्या चार दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. शुक्रवारी सायंकाळपासून रविवारपर्यंत सर्वत्र मुसळधार पाऊस झाला. घाटंजी तालुक्यात वीज पडून इसमाचा मृत्यू झाला. महागाव, बाभूळगाव तालुक्यात दोघेजण पुरात वाहून गेले.





















## कावड यात्रेत अपघात १५ शिवभक्त जखमी

■ **महासागर प्रतिनिधी**
**अकोला, दि. १८ :**
शहरातील कावड व पालखी महोत्सवात डाबकीरोडवासी मंडळाची कावड गांधीग्रामकडे जात असताना ट्रॅक्टरची ट्रॉली उलटल्याने अपघात झाला.

या अपघातात १५ शिवभक्त जखमी झाले आहेत. जखमींवर शासकीय व खासगी रुग्णालयात उपचार केले जात आहेत. भाजप आमदार रणधीर सावरकर यांनी जखमींवर योग्य उपचार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.





